रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ९६
www.ramprahar.com
मंगळवार, २२ ऑक्टोबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

शिवसेना उबाठाला सुधारित मशाल चिन्ह/२
दिवाळी फराळ विक्रीतून महिलांना रोजगार/६
मुंबईचा महाराष्ट्र संघावर दणदणीत विजय/८

## 'अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देणार'



**मुक्ताईनगर (जळगाव) :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना कुठल्याही परिस्थितीत बंद पडू देणार नाही याचा पुनरूच्चार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुक्ताईनगर येथे केला तसेच राज्यात सरकार आल्यानंतर लाडक्या बहिणींना दीड हजाराऐवजी दोन हजार रुपये मिळतील, असे आश्वासन दिले. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई देण्याचेही त्यांनी जाहीर केले. मुक्ताईनगर येथे सोमवारी (दि. २१) महायुतीचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. ते म्हणाले की, आचारसंहिता लागल्यानंतर लाडकी बहीण योजनेला विरोधक खोडा घालतील म्हणून आधीच पाच हप्ते बहिणींच्या बँक खात्यात जमा केले आहेत. या मेळाव्यात मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली.

# विरोधकांचा अपप्रचार खोडून काढा

## ■ लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकसभा निवडणुकीप्रमाणे या विधानसभा निवडणुकीतही विरोधकांकडून स्वार्थापोटी खोटा प्रचार करून जनतेची दिशाभूल करण्याबरोबरच समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यामुळे हा खोटा प्रचार हाणून पाडण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने सतर्क रहावे, असे मार्गदर्शनपर आवाहन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी येथे केले. सेक्टर प्रमुख व सेक्टर प्रभारी यांची बैठक तसेच राज्यपाल नियुक्त आमदार विक्रांत पाटील यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.




या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, दीपक बेहेरे, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक हरेश केणी, तालुका उपाध्यक्ष एस.के. नाईक, संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, सुनील घरत, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष कमला देशेकर, शहर अध्यक्ष राजेश्री वावेकर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांच्यासह माजी नगरसेवक, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, सेक्टर प्रमुख व सेक्टर प्रभारी, पदाधिकारी उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे म्हटले की, लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव विमानतळाला लागण्यासाठी आपण सर्व प्रकारच्या लढाया लढल्या आहेत. मोर्चे, आंदोलने, बैठका, पाठपुरावा केला आहे. त्या अनुषंगाने 'दिबां'चे नाव देण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आला आणि 'दिबां'व्यतिरिक्त इतर कोणाच्याही नावाचा प्रस्ताव केंद्राकडे आला नसल्याचे केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री किंजरापू राममोहन नायडू यांनी स्पष्ट केले आहे तसेच आमचे सरकार 'दिबां'च्या आणि आपल्या संघर्षाचा सन्मान करीत असल्याचे त्यांनी सांगून लवकरच 'दिबां'चे नाव विमानतळाला जाहीर करण्याचे आश्वासनही केंद्र सरकारच्या वतीने त्यांनी दिले आहे. असे स्पष्ट असतानाही निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिशाभूल करण्याचा प्रयत्न विरोधकांकडून केला गेला आणि त्या अनुषंगाने स्व. रतन टाटा यांचे नाव देण्याच्या वावड्या उठवण्यात आल्या. त्यामुळे अशा प्रकारच्या अनेक बाबतीत विरोधाभास निर्माण करून खोटा प्रचार करण्याचा प्रयत्न विरोधकांकडून केला जाईल. त्यांच्या भूलथापांना जनता भुलणार नाही, मात्र आपणही त्यांचा अपप्रचार खोडून काढला पाहिजे.

पुढे बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी राज्यपाल नियुक्त आमदार विक्रांत पाटील यांचे कौतुक केले. विक्रांतच्या निमित्ताने आनंदाची बातमी मिळाली. तो आपल्या सर्वांसाठी आनंदाचा क्षण असल्याचे अधोरेखित करून संघटनात्मक जबाबदारी पार पाडताना मिळालेला सन्मान असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. विक्रांत पाटील यांचा आचारसंहिता असल्याने आज छोटेखानी सत्कार घेण्यात आला, पण निवडणूक संपल्यानंतर आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील यांचा विजयी भव्य जाहीर सत्कार सोहळा आयोजित करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या बैठकीदरम्यान भाजप पक्षश्रेष्ठींकडून उमेदवारी जाहीर झाल्याचे वृत्त प्रसारित झाल्याने विजयी घोषणा देत जल्लोष करण्यात आला. उमेदवारी दिल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षनेतृत्वाचे तसेच पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे व जनतेचे आभार मानले. भाजपच्या कार्यकर्त्याला संधी मिळते, त्याचे उदाहरण आमदार विक्रांत पाटील असल्याचे त्यांनी म्हटले. आपल्याला कधी काही मिळेल याची अपेक्षा कार्यकर्ता बाळगत नाही तर काम करत राहायचे हा भाजप कार्यकर्त्याचा पिंड आहे. बाळासाहेब पाटील यांनी गेली ४० वर्षे मेहनत आणि जिद्दीने काम केले, असे सांगतानाच विक्रांत पाटील यांनी केलेली मेहनत फळाला आली असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

खारघर टोलमुक्ती करण्याच्या दृष्टिकोनातून आपण भाजपमध्ये सहभागी झालो. त्या वेळी देवेंद्रजी यांनी आम्हाला टोलमुक्तीचा शब्द दिला होता आणि तो शब्द त्यांनी पूर्ण करून दिला. त्या ऐतिहासिक निर्णयाचा फायदा वाहनचालकांना झाला. त्यानंतर अनेक प्रकल्प, योजना, विकासकामे देवेंद्रजींच्या व महायुतीच्या नेतृत्वामुळे पनवेल क्षेत्रात आली. यापुढीलही काळात विकासाचा महामेरू चालत राहील, असा विश्वासही आमदार प्रशांत ठाकूर यांनी जनतेला दिला. **(पान २ वर..)**

# भाजपपाठोपाठ इतर पक्षांचे उमेदवार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

विधानभा निवडणुकीसाठी महायुतीमधील प्रमुख पक्ष भारतीय जनता पक्षाने आपल्या ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केल्यानंतर आता इतर पक्षही आपले उमेदवार घोषित करू लागले आहेत. मनसे तसेच तिसरी आघाडी म्हणून उदयास आलेल्या परिवर्तन महाशक्ती आघाडीने आपले काही उमेदवार जाहीर केले, तर वंचित बहुजन आघाडीने पाचवी यादी जाहीर केली आहे.

### मनसेचे दोन उमेदवार घोषित

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आपले दोन उमेदवार जाहीर केले आहेत. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीनंतर राज यांनी कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून राजू पाटील आणि ठाण्यातून अविनाश जाधव यांची उमेदवारी घोषित केली.

### तिसऱ्या आघाडीची पहिली यादी जाहीर

माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी आणि आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वातील परिवर्तन महाशक्ती आघाडीने आठ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यामध्ये चार जागा प्रहार जनशक्ती पक्षाला, तर दोन जागा महाराष्ट्र स्वराज्य पक्ष आणि प्रत्येकी एक जागा स्वतंत्र भारत पक्ष व महाराष्ट्र राज्य समितीला देण्यात आली आहे.

प्रहार पक्षाकडून बच्चू कडू (अचलपूर), अनिल चौधरी (रावेर), गणेश निंबाळकर (चांदवड), सुभाष साबणे (देगलूर बिलोली); महाराष्ट्र स्वराज्य पक्षाकडून अंकुश कदम (ऐरोली), माधव देवसरकर (हदगाव); स्वतंत्र भारत पक्षाकडून वामनराव चटप (राजुरा) आणि महाराष्ट्र राज्य समितीकडून गोविंदराव भवर (हिंगोली) यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

याशिवाय शिरोळ आणि मिरज या दोन जागा स्वाभिमानी शेतकरी संघटनेला देण्यात आल्या आहेत. ही नावे मंगळवारी जाहीर केली जाणार आहेत.

### 'वंचित'ची पाचवी यादी

प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीने उमेदवारांची पाचवी यादी जाहीर केली. यामध्ये १६ उमेदवारांचा समावेश आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या पाचव्या यादीत जगन देवराम सोनवणे (भुसावळ), डॉ. ऋतुजा चव्हाण (मेहकर), सुगत वाघमारे (मूर्तीजापूर), प्रशांत सुधीर गोळे (रिसोड), लोभसिंग राठोड (ओवळा माजिवडा), विक्रांत चिकणे (ऐरोली), परमेश्वर रणशुर (जोगेश्वरी पूर्व), राजेंद्र ससाणे (दिंडोशी), अजय रोकडे (मालाड), संजीवकुमार कलकोरी (अंधेरी पूर्व), सागर गवई (घाटकोपर पश्चिम), सुनीता गायकवाड (घाटकोपर पूर्व), आनंद जाधव (चेंबूर), मंगलदास निकाळजे (बारामती), अण्णासाहेब शेलार (श्रीगोंदा), डॉ. शिवाजीराव देवनाळे (उदगीर) यांची नावे आहेत. यापूर्वी 'वंचित'च्या चार याद्या जाहीर झाल्या होत्या. आता पाचव्या यादीमुळे त्यांचे एकूण ६७ उमेदवार घोषित झाले आहेत.

### राष्ट्रवादीकडून उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप

विधानसभा निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वेगळा पॅटर्न राबवत राष्ट्रवादीच्या उमेदवारांना एबी फॉर्म वाटप करणे सुरू केले आहे. यादी जाहीर करण्यापूर्वीच उपमुख्यमंत्री अजित पवार उमेदवारी निश्चित असलेल्या आमदारांना देवगिरी बंगल्यावर एबी फॉर्मचे वाटप करत आहेत. त्यामुळे 'देवगिरी'वर अजितदादांच्या नेत्यांची मोठी गर्दी झाली असून आतापर्यंत भरत गावित आणि हिरामण खोसकर यांच्यासह १७ उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप करण्यात आल्याचे वृत्त आहे.

## निवडक

### भारत आणि चीनमध्ये लष्करासंदर्भात करार

**नवी दिल्ली :** प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर गस्त घालण्याबाबत भारत आणि चीन यांच्यात एक नवीन करार झाला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने याबाबत एक निवदेन जारी केले आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले की, गेल्या अनेक आठवड्यांपासून भारत आणि चीनमध्ये राजनैतिक आणि लष्करी स्तरावर चर्चा सुरू आहे. सैन्य मागे घेण्यासाठी आणि परिस्थितीचे निराकारण करण्यासाठी गस्तीची व्यवस्था करण्यात आली आहे.

### आचारसंहिता भंगप्रकरणी काँग्रेस आमदारावर गुन्हा

**पुणे :** कसबा पेठ विधानसभेतील काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांच्याशी संलग्न असणाऱ्या हिंदमाता प्रतिष्ठानकडून दिवाळी सरंजाम वाटप करणारा टेम्पो निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाने व काही सामाजिक कार्यकर्त्यांनी पकडला. यानंतर आमदार धंगेकर व इतरांच्या विरोधात आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आचारसंहिता लागू असतानादेखील आमदार धंगेकर यांचा फोटो असलेल्या बॅगमधून हा दिवाळी सरंजाम वाटला जात होता. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# भारताकडे डबल एआयची शक्ती -पंतप्रधान मोदी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताकडे आज डबल एआयची शक्ती आहे. एक म्हणजे आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि दुसरे ॲस्पिरेशनल इंडिया. खरंतर भारतासाठी एआय हे केवळ तंत्रज्ञान नाही, तर तरुणांच्या प्रगतीसाठी मोठी संधी आहे, असे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडले आहे. दिल्लीत झालेल्या एनडीटीव्ही वर्ल्ड समिटला संबोधित करताना ते बोलत होते.

भारताने तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण करून जगाला डिजिटल क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा नवा मार्ग दाखवला आहे, असे सांगून पंतप्रधान मोदी म्हणाले की, डिजिटल इनोव्हेशन आणि लोकशाही मूल्ये एकत्र राहू शकतात हे भारताने जगाला दाखवून दिले आहे. तंत्रज्ञान कुणावर नियंत्रण मिळवण्याचे किंवा विभाजन करण्याचे नाही, तर पारदर्शकता आणि सक्षमीकरणाचे साधन आहे. भारत कोणालाही गृहीत धरून नाते निर्माण करत नाही. आमचे नाते हे विश्वासावर आधारित आहे. जगालाही आता ही गोष्ट समजली आहे.

पंतप्रधान मोदींनी पुढे बोलताना, भारत हा जगातील सर्वात तरुण देश आहे. या तरुणांमध्ये असलेली क्षमता देशाला नव्या उंचीवर नेऊ शकते. भारत आज एक उदयोन्मुख शक्ती आहे. देशापुढे गरिबीचे मोठे आव्हान आहे, परंतु या आव्हानांचा सामना कसा करायचा हेदेखील आपल्याला माहिती आहे. देशाच्या १४० कोटी जनतेने देशाच्या विकासाचा संकल्प केला आहे. जनता सरकार चालवत आहेत. ही लोकसहभागाची एक मोठी चळवळ बनली आहे, असेही नमूद केले.

# भाजप जो शब्द देतो तो पूर्ण करतो

## ■ आमदार प्रशांत ठाकूर यांचे खारघरमध्ये प्रतिपादन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष जो शब्द देतो तो पूर्ण करून दाखवतो. पनवेल परिसराचा विकास हा भाजपच्या पाठपुराव्यामुळेच झाला. त्यामुळे विरोधक जे चुकीचा प्रचार करत आहेत त्याला उत्तर द्या, असे प्रतिपादन पनवेल विधानसभा मतदारसंघाचे भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघरमध्ये केले.




भाजप अनुसूचित जाती मोर्चा खारघर मंडळाचा संवाद मेळावा रविवारी (दि. २०) सेक्टर १९मधील श्री. रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते.

या मेळाव्यास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, हरेश केणी, माजी नगरसेविका आरती नवघरे, भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, अमरीश मोकल, शहर सरचिटणीस दीपक शिंदे, विधानसभा विस्तारक सागर मोरे, महिला मोर्चा शहर अध्यक्ष साधना पवार, जिल्हा संयोजक राजेंद्र अग्रवाल, बिना गोगरी, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस संध्या शारबिद्रे, सीमा खडसे, शामला शेट्टीगर, संतोष शर्मा, समीर कदम, प्रभाग ६ अध्यक्ष रामचंद्र पाटील, अरुण सोळंकी, प्रदिप शेलार, मंगल घोलप, अनुसूचित जाती मोर्चाचे खारघर मंडळ अध्यक्ष संदीप माघाडे, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपने केलेल्या पाठपुराव्यामुळे पनवेलचा विकास झाला आहे. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीच्या माध्यमातून ठरवण्याची वेळ आली आहे आपल्याला सातत्याने फसवणूक करणारे पाहिजेत की, विकासाच्या दृष्टीने पुढे नेणारे भाजप महायुतीचे सरकार पाहिजे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले. इतर नेत्यांचीही समयोचित भाषणे झाली.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून निवडणूक कामकाजाचा आढावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगडचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी पेण विधानसभा मतदारसंघाला भेट देऊन कामकाजाचा आढावा घेतला तसेच तेथील स्ट्राँगरूमला भेट देऊन तेथील व्यवस्थेचा आढावा घेतला.



पेण उपविभागीय अधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांनी पेण विधानसभा मतदारसंघात निवडणूकीच्या अनुषंगाने आढावा बैठक घेतली. या बैठकीस पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, निवडणूक निर्णय अधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, उत्तम कुंभार, उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.


निवडणुकीमध्ये प्रत्येक विभागाची भूमिका महत्त्वाची आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी चोखपणे पार पाडावी. आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे जिल्हाधिकारी जावळे यांनी या वेळी सांगितले. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयातील विविध कक्षांना जिल्हाधिकाऱ्यांनी भेट देऊन आढावा घेतला.

जिल्हाधिकारी जावळे व पोलीस अधीक्षक घार्गे यांनी ईव्हीएम यंत्राचे वाटप व मतमोजणीच्या दिवशी स्ट्राँगरूममधील जागेचे नियोजन याची माहिती घेतली. ईव्हीएम सुरक्षेच्या दृष्टीने स्ट्राँगरूमचे ठिकाण व परिसराची पाहणी केली. जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी कायदा व सुव्यवस्था आणि सुरक्षेचाही आढावा घेतला.

# गडचिरोलीत चकमकीमध्ये पाच माओवादी ठार

**गडचिरोली : प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने विध्वंसक कारवाया करून घातपात घडविण्याच्या उद्देशाने कट रचण्याच्या तयारीत असलेल्या माओवाद्यांना लष्कराने दणका दिला आहे. जवानांसोबत झालेल्या चकमकीत पाच माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला.



गडचिरोली महाराष्ट्र व नारायणपूर छत्तीसगड सीमेलगत असलेल्या कोपर्शी (ता. भामरागड) जंगल परिसरात माओवादी दबा धरून बसल्याची गोपनीय माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाल्याने अप्पर पोलीस अधीक्षक यतिश देशमुख व एम. रमेश यांच्या नेतृत्वात सी ६० पथकाच्या २२ तुकड्या आणि सीआरपीएफच्या दोन तुकड्या या कोपर्शी जंगल परिसरात मोहीम राबवत होत्या. या अभियानात पाच माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात गडचिरोली पोलीस दलास यश आले. त्यानंतरही जंगल परिसरात शोधमोहीम सुरू होती.

# महिलेला चिरडणाऱ्या पर्यटकांना तीन दिवसांची पोलीस कोठडी

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**




हॉटेल रूममधील भाड्याच्या रकमेवरून झालेल्या वादातून एका महिलेला पर्यटकांनी अंगावर गाडी घालून चिरडून मारल्याची घटना हरिहरेश्वर येथे रविवारी रात्री घडली होती. या गुन्ह्यातील पकडलेल्या तीन हल्लेखोर पर्यटकांना श्रीवर्धन न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

पुण्याच्या पिंपरी चिंचवडमधील ११ पर्यटक हरिहरेश्वर येथे असणाऱ्या ममता होमस्टे या ठिकाणी रविवारी मध्यरात्री साधारण १.३०च्या सुमारास स्कॉर्पिओ गाडीने आले होते. हे पर्यटक मद्यधुंद अवस्थेत होते. त्यांनी रूमच्या भाड्यावरून झालेल्या वादावादीत ममता होमस्टेचे मालक अभि धामणस्कर यांची बहीण ज्योती धामणस्कर यांची गाडीखाली चिरडून हत्या केली होती. या प्रकरणी श्रीवर्धन पोलिसांनी इरप्पा यमनप्पा धोत्रे, आकाश गोविंद गावडे, विकी प्रेमसिंग गिल या तिघांना रविवारीच अटक केली होती. या तिघांना सोमवारी (दि. २१) श्रीवर्धन येथील न्यायालयासमोर हजर करण्यात आले. तेव्हा न्यायालयाने तिघांनाही २४ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

या घटनेतील अन्य आरोपींचा शोध सुरू आहे. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी दोन पथके तयार करण्यात आली असून त्यांचा शोध सुरू आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांनी दिली.

# सी-व्हिजिल ॲपवर ७७६ तक्रारी प्राप्त

## ७७३ निकाली; ३१ कोटी १६ लाखांची मालमत्ता जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४साठी १५ ऑक्टोबरपासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. १५ ते २१ ऑक्टोबरपर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल ॲपवर एकूण ७७६ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ७७३ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत.

एकूण ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत, अशी माहिती राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली आहे.




सजग नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी-व्हिजिल ॲप हे कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या ॲपद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज आदी बाबतीत एकूण ३१ कोटी १६ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. आचारसंहितेची राज्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचेही डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले.

## पनवेल रेल्वेस्थानकात आढळला मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्मवर एक व्यक्ती बेशुद्धावस्थेत आढळला. त्याचा पनवेल उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांच्या नातेवाईकांना शोध पनवेल रेल्वे पोलीस घेत आहेत. मृत व्यक्तीचे वय ५५ वर्षे असून उंची ५.५ फूट, अंगाने मध्यम, रंग सावळा, चेहरा उभट, दाढी वाढलेली आहे. अंगात गुलाबी शर्ट, निळी पँट आहे. या व्यक्तीविषयी कुणाला माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (०२२-२७४६७१२२) अथवा (८५३०६९९६६८) येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक एम. डी. गवळी यांनी केले आहे.

# भारताशी शैक्षणिक सहकार्य वाढवण्यासाठी फ्रान्स उत्सुक -जॉन मार्क सेर शार्ले

**मुंबई : प्रतिनिधी**

आता फ्रान्स भारताशी शैक्षणिक सहकार्य वाढविण्याबद्दल उत्सुक असून आज फ्रान्स येथील विद्यापीठांमध्ये किमान १७०० अभ्यासक्रम इंग्रजीतून राबविले जातात. फ्रान्समध्ये शिकण्यासाठी फ्रेंच भाषा येणे आवश्यक नाही, असे प्रतिपादन फ्रान्सचे मुंबईतील वाणिज्यदूत जॉन मार्क सेर शार्ले यांनी केले.

वाणिज्यदूत सेरे शार्ले यांनी सोमवारी (दि.२१) राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली त्या वेळी ते बोलत होते. आयआयटी मुंबई व फ्रान्सचे इकोल पॉलिटेक्निक यांच्यात शैक्षणिक सहकार्य व विद्यार्थी परस्पर आदानप्रदान याबाबत नुकताच करार झाला असल्याचे फ्रान्सच्या वाणिज्यदुतांनी या वेळी राज्यपालांना सांगितले.



फ्रान्सच्या अंदाजे ५०० कंपन्या मुंबई, पुणे, नागपूर व नाशिक येथे कार्यरत असून त्याठिकाणी रोजगार निर्मिती तसेच कौशल्यवर्धन करीत असल्याचे त्यांनी सांगितले. फ्रान्स भारताशी वैज्ञानिक नवोन्मेष (इनोव्हेशन) व संशोधन क्षेत्रात काम करण्यास उत्सुक असल्याचे सेर शार्ले यांनी सांगितले.

२०२६ हे वर्ष फ्रान्स-भारत नवोन्मेष वर्ष साजरे केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. अलियान्स फ्रान्सेस ही संस्था मुंबई, पुणे यांसह इतरत्र फ्रेंच भाषा अध्यापनाचे काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले. फ्रान्समध्ये मोठ्या संख्येने भारतीय राहत असून हा समुदाय विविध क्षेत्रात योगदान देत असल्याचे त्यांनी सांगितले.

फ्रान्स-भारत व्यापार संबंध दृढ होण्यासाठी भारत व युरोपिअन महासंघामध्ये मुक्त व्यापार करार होणे आवश्यक आहे, असे राज्यपाल राधाकृष्णन यांनी या वेळी सांगितले. भारत-फ्रान्स या देशांमध्ये संरक्षण क्षेत्रापासून अनेक क्षेत्रात उत्तम सहकार्य असून ऊर्जेबाबत स्वयंपूर्ण असणाऱ्या फ्रान्सने भारताला स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये मदत करावी, अशी अपेक्षा राज्यपालांनी या वेळी व्यक्त केली. भारत व फ्रान्स दोन्ही लोकशाही राष्ट्रे असून विद्यार्थी व सांस्कृतिक आदानप्रदानामुळे उभय देशांमधील संबंध अधिक घनिष्ठ संबंध प्रस्थापित होतील, असा विश्वास राज्यपालांनी व्यक्त केला.

# माथेरानमध्ये मैला उचलण्याची प्रथा आजही कायम

## सफाई कर्मचाऱ्यांना आरोग्य समस्या भेडसावण्याची भीती

**माथेरान : प्रतिनिधी**

जग २१व्या शतकात जात असताना माथेरानमध्ये ब्रिटिश काळापासून पूर्वापार चालत आलेली मैला उचलण्याची प्रथा आजही कायम असल्याने पर्यटकांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

पाच दशकांपूर्वी माथेरान या पर्यटनस्थळी उघडी डब्यांची शौचालय अस्तित्वात होती. त्या वेळी नगर परिषदेच्या सफाई कामगारांमार्फत डब्यात साठलेला मैला मनुष्यबळाचा वापर करून नेत असत. कालांतराने येथील शौचालयाला सेफ्टी टँक बांधण्यात आल्यामुळे हा सर्व मैला या टँकमध्ये साठला जायचा. त्यानंतर हे सांडपाणी कड्यात ड्रेनेज लाईनद्वारे सोडले जात होते, तर रस्त्यावर पडलेली घोड्यांची विष्ठा (मैला) आजही नगर परिषदेच्या कामगारांमार्फत उचलण्यात येत आहे. हा सर्व मैला सफाई कामगार डब्यात भरून अडगळीच्या ठिकाणी अथवा डंपिंग ग्राउंडवर जमा करीत आहेत. ही दुर्गंधीयुक्त कामे करताना कामगारांना गंभीर आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या मैल्यामुळे श्वसनाचे आजार दमा, हातपाय दुखणे तसेच अन्य आजार बळावण्याची दाट शक्यता आहे.



पूर्वी येथील लाल तांबडी माती एखाद्या सौभाग्याप्रमाणे माथेरानच्या मस्तकावर शोभून दिसत होती, परंतु पर्यटक वाहून नेणाऱ्या घोड्यांची संख्या जवळपास ५००च्या आसपास असून मालवाहू घोड्यांची संख्याही याठिकाणी अधिक आहे. त्यामुळे या सर्व घोड्यांच्या विष्ठेने हिच तांबडी माती पिवळसर झाली आहे. काही वर्षांपूर्वी इथे क्ले-पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविण्यात आल्याने रस्त्याच्या दुतर्फा सगळीकडे पिवळसर माती दिसून येत आहे. टपाल पेटीपासून पुढे दस्तुरी नाक्यापर्यंत पूर्णपणे रस्त्यांची साफसफाई नियमितपणे केली जात नाही. त्यामुळे ही लीदमिश्रित माती रस्त्याच्या दुतर्फा साठलेली नजरेस पडत असते. नगर परिषदेने सफाई कामगारांमार्फत नियमितपणे ही स्वच्छता करून घेतल्यास सर्वांचे आरोग्य सुरक्षित राहण्यास मदत होणार आहे.

नगर परिषदेच्या ताब्यातील मागील वर्षीच्या सात ई-रिक्षा धूळ खात पडून आहेत. सनियंत्रण समितीकडे पाठपुरावा करून यातील काही ई-रिक्षा मैला वाहून नेण्यासाठी उपयोगात आणल्यास कामगारांचे श्रम काही अंशी वाचतील.

## शिवसेना उबाठा पक्षाला सुधारित मशाल चिन्ह

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला देण्यात आलेल्या मशाल या निवडणूक चिन्हात विधानसभा निवडणुकीपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने काही बदल करून नव्या स्वरूपातील चिन्ह दिले आहेत. नव्याने देण्यात आलेल्या चिन्हाचा वरचा आकार आता बॅटरीसारखी दिसणार आहे.

यापूर्वी तो आईस्क्रीमच्या कोनासारखा दिसत होता. वरच्या बाजूला ज्वाला आणि खाली त्याला बॅटरीसारखा आकार असे बदल या चिन्हात करण्यात आले असून चिन्हाच्या आतील बाजूस असलेला भगवा रंगही काढण्यात आला आहे. आगामी निवडणुकीत ईव्हीएमवरही हे नव्या स्वरूपातील निवडणूक चिन्ह दिसणार आहे.

# आमदार मंदा म्हात्रेंनी घेतली उपमुख्यमंत्री फडणवीसांची भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाकडून मंदा म्हात्रे यांना तिसऱ्यांदा अधिकृत उमेदवारी जाहीर झाली. आमदार म्हात्रे यांनी प्रचार सुरू करण्याआधी राज्याचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगला शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली.

माझ्यावर विश्वास टाकून पुन्हा एकदा नवी मुंबई १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाकडून निवडणूक



लढण्याची व नवी मुंबईकरांची सेवा करण्याची संधी दिली त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली, तसेच पक्षातील सुरू असलेल्या घडामोडींबाबतदेखील चर्चा करण्यात आली. या वेळी फडणवीसांनी आमदार म्हात्रे यांना पाठीशी असल्याचा दिलासा दिला.

# नेरळ ग्रामपंचायतीच्या प्रशासकपदी सुजित धनगर

**माथेरान : प्रतिनिधी**

नेरळ ग्रामपंचायतीच्या प्रशासकपदी राजिप लघु पाटबंधारे कर्जत विभागाचे प्रभारी उपअभियंता सुजित धनगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

माथेरान डोंगराच्या पायथ्याशी नेरळ गाव आहे. मागील काही दिवसांपूर्वी येथील ग्रामपंचायत सदस्यांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त करीत सर्व सदस्यांनी एकत्रित येऊन या ठिकाणी सर्वांनी राजीनामे दिले होते. त्यामुळे बहुचर्चित अशी नेरळ ग्रामपंचायत विसर्जित करण्यात आली होती. नेरळ ग्रामपंचायत विसर्जित झाल्यानंतर ग्रामस्थांच्या सुविधेसाठी प्रशासक नेमणे गरजेचे होते. यासाठीच राजिप लघु पाटबंधारे कर्जत विभागाचे प्रभारी उपअभियंता सुजित धनगर यांची नियुक्ती याठिकाणी करण्यात आली आहे.

पान १ वरुन

## विरोधकांचा अपप्रचार खोडून काढा

या वेळी प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील यांनी म्हटले की, लोकनेते रामशेठ ठाकूर विरोधी पक्षात होते तेव्हासुद्धा त्यांच्याप्रती कायम आम्हाला आदर होता. आणि तो आदर भाजपमध्ये वृद्धिंगत झाला. कर्णानंतर दानशूर म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर आहेत, तर आमदार प्रशांत ठाकूर संयमी आणि दिलेली वेळ पाळणारे, सामाजिक जाणीव असलेले लोकप्रतिनिधी आहेत. त्यांच्या पाठीशी सर्वांचे आशीर्वाद असून विजय निश्चित आहे, फक्त भरघोस मतांनी जिंकायचे आहे. त्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आमदार विक्रांत पाटील यांचा झालेला सत्कार राजकीय जीवनातील मोठी अचिव्हमेंट असल्याचेही नमूद केले.

या वेळी आमदार विक्रांत पाटील यांनी आपल्या जीवनातील राजकीय आढावा मांडला. लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी माझा सन्मान केला, त्याबद्दल मी भारावून गेलो आहे. बाहेरचे लोकं कौतुक करतात, पण जेव्हा घरच्या लोकांकडून कौतुकाची थाप मिळते तेव्हा तो आनंद वेगळाच असतो आणि तो आजच्या सत्काराने मला झाला असून हे माझ्यासाठी अभिमानाचे आहे. त्यामुळे मी तुमच्या प्रेमातून कधीही उत्तराई होऊ शकत नाही. लोकनेते रामशेठ ठाकूर हे मार्गदर्शनाचे विद्यापीठ आहे. आपल्या सर्वांचे नेते देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री रवींद्र चव्हाण, चंद्रकांत पाटील, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद आपल्या सर्वांच्या पाठीशी आहेत. विधायक कार्य, वेळ, पायाला भिंगरी लावून काम करणे अशा अनेक गोष्टी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शिकण्यासारख्या आहेत. आपला नेता शंभर नंबरी आहे. विरोधक वातावरण दूषित करण्याचे काम करतील, पण आपण सर्वांनी सजग राहिले पाहिजे. या निवडणुकीत प्रत्येकाने मीच उमेदवार असे समजून काम करा. फक्त विजय नाही तर मतांचा लीड महत्त्वाचा आहे, असेही त्यांनी म्हटले.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी सांगितले की, विरोधकांकडून अपप्रचार केला जात आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांचे गेल्या अनेक वर्षांपासून प्रत्येक मंडलात कार्यालय आहे आणि त्या कार्यालयांच्या माध्यमातून लोकांचे प्रश्न मार्गी लावण्याचे तसेच विविध योजना लोकापर्यंत पोहचवण्याचे काम केले जाते, मात्र विरोधकांकडे कुठलाही मुद्दा नसल्याने ते आता वेगवेगळ्या क्लुप्त्या करत खोटा प्रचार करत आहेत तसेच लाडकी बहीण किंवा इतर योजना बंद करण्याच्या अफवाही उठवत आहेत. त्या अफवांनाही नागरिकांनी बळी पडू नये.



# कोपरखैरणे, घणसोलीत मतदानविषयी व्यापक जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक २० नोव्हेंबर २०२४ रोजी होत आहे. या अनुषंगाने मतदार जागरुकता व सहभाग कार्यक्रम अर्थात स्वीप अंतर्गत मतदान करण्याचा संदेश मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी घणसोली व कोपरखैरणे भागात वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले.

यामध्ये कोपरखैरणे येथील एफ.जी.नाईक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. ५००हून अधिक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी फलक उंचावत, घोषणा देत २० नोव्हेंबरला




मतदान करण्याचा संदेश प्रसारित केला.

घणसोली येथील शेतकरी शिक्षण संस्थेचे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडीज् या ठिकाणी वर्गांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यात आले व सक्षम लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. त्याचप्रमाणे मतदार शपथही घेण्यात आली.

अशाचप्रकारे कोपरखैरणे गाव से.१९ येथील बुद्धविहारात जमलेल्या उपस्थित नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून देऊन मतदान करण्याचे सूचित करण्यात आले. या वेळी मतदार शपथ घेण्यात आली, तसेच मतदानविषयक संकल्पपत्रेही भरून घेण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्वीप अंतर्गत व्यापक प्रमाणात जनजागृती करीत आहे. नवी मुंबई मनपा क्षेत्राचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नियुक्त स्वीप नोडल अधिकारी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली ऐरोली विधानसभा मतदारसंघाच्या स्वीप नोडल अधिकारी अभिलाषा म्हात्रे-पाटील यांच्या माध्यमातून विभाग कार्यालय पातळीवरून या मतदार जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## पेणमध्ये मलेरिया, ताप, खोकल्याच्या रुग्णांमध्ये वाढ

**पेण : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यात तीव्र उन्ह आणि पाऊस अशा बदलामुळे पेण तालुक्यात वेगवेगळ्या आजारांमध्ये वाढ होऊ लागली आहे. मलेरिया, ताप आणि सर्दी खोकल्याच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे.

या बदलत्या हवामानानुसार व गटारांमध्ये, घराच्या छतावर टायर, हौद, प्लॅस्टिक डब्यांमध्ये साचून राहिलेल्या पाण्यामध्ये डेंग्यूचा फैलाव करणाऱ्या डासांची उत्पत्ती होत असून डेंग्यूसदृश्य आजाराचाही फैलाव होण्यास सुरुवात झाली आहे. याशिवाय दमट वातावरण अन्य अपुऱ्या सुर्यप्रकाश यामुळे विविध आजारांची लागण लहानांपासून मोठ्यांपर्यंत दिसून येत आहे. हवामान बदलावामुळे तसेच वाढत्या डासांच्या उत्पत्तीमुळे रक्तातील पेशी कमी होण्याचे प्रकार व मलेरियासारखे आजाराचे रुग्ण दिसून येत आहेत.

# सोशल मीडियावरील पॉलिटिकल पोस्टवर आयोगाची करडी नजर

**ठाणे : रामप्रहर वृत्त**

विधानसभा निवडणुकीच्या काळात सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. साहजिकच मतदारांना प्रलोभन दाखवणे, जनभावना भडकवणे आणि आचारसंहिता भंग होईल, असे कृत्य होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी सोशल मीडियावर नजर ठेवण्यासाठी विशेष पथकाची नेमणूक केली आहे.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी जोर पकडत आहे. त्यामुळे राजकीय पक्षांबरोबरच उत्साही कार्यकर्तेदेखील निवडणुकीच्या प्रचारासाठी सज्ज झाले आहेत. त्यामुळे निवडणुकांमध्ये सोशल मीडियाचा उपयोगही वाढला आहे. निवडणुकीत अनेक इच्छुक उमेदवारांनी विविध मीडिया प्लॅटफॉर्मवर आपले ग्रुप, पेज तयार केले असून, त्यावर प्रचार-प्रसार करण्यात येत आहे.

सोशल मीडिया निवडणूक प्रचाराचे प्रभावी माध्यम मानले जात असून, सर्व राजकीय पक्ष याचा वापर करीत आहेत. त्यामुळे पोलिसांनी सोशल मीडियाकडे आपली नजर वळविली आहे. निवडणुकीत उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांना सोशल मीडियावर प्रचार करण्याकरिता निवडणूकआयोगाकडून मंजुरी आवश्यक आहे. निवडणुकांसाठी आयोगाने आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. ही आचारसंहिता सोशल मीडियालाही लागू राहणार आहे.

उमेदवारांना निवडणुकीचा प्रचार करण्याकरिता सोशल मीडियावर टाकण्यात येणार्या ध्वनिफीत व चित्रफितीसाठी निवडणूक आयोगाकडून परवानगी घ्यावी लागत आहे. इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सॲपसह अन्य सोशल मीडियाच्या माध्यमातून उमेदवारांच्या जाहिराती अथवा इतर मजकूर प्रसिद्ध करताना परवानगी बंधनकारक आहे. परवानगी न घेता प्रचार करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत पोलिसांनी दिले आहे.

व्हॉट्सॲप, फेसबुक यासारख्या सोशल मीडियाचा वापर करताना कोणत्याही नेत्याची बदनामी करणे, सामाजिक शांतता बिघडविणे, मतदारांना प्रलोभने दाखवणे वा कोणाच्या भावना दुखावण्यासारखा प्रकार होण्याची शक्यता निवडणूक काळात होऊ शकतो. हा प्रकार थांबवण्यासाठी ठाणे पोलीस सज्ज झाले असून सोशल मीडियावरील वरील गैरप्रकार रोखण्यासाठी एका विशेष पोलीस पथकाची निर्मिती करण्यात आली आहे. हे पथक निवडणूक काळात सोशल मीडियातून होणारा गैरप्रकार रोखण्यासाठी कार्यरत राहणार आहेत, तसेच सोशल मीडियाबाबत येणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने कारवाई करणार आहेत.

# महिलेवर हल्ला करून लूटले

## कळंबोली पोलिसांकडून रिक्षाचालकाला अटक; मुद्देमाल हस्तगत

**पनवेल : वार्ताहर**

रिक्षामध्ये बसलेल्या वृध्द महिलेला आडमार्गावर नेऊन तिच्या डोक्यात दांडक्याने हल्ला करून दागिने आणि मोबाईल फोन लुटून फरार झालेल्या रिक्षाचालकाला कळंबोली पोलिसांनी आणि मध्यवर्ती गुन्हे कक्षाने अवघ्या काही तासात अटक केल्याची घटना घडली आहे.



अनंता पालेकर (वय ३९) असे या आरोपी रिक्षाचालकाचे नाव असून त्याला पतपेढी कडून कर्ज भरण्यासाठी तगादा लावण्यात येत असल्यामुळे त्याने हे कृत्य केल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. पोलिसांनी त्याच्याकडून लुटलेले सर्व दागिने आणि मोबाईल फोन हस्तगत केले आहे. या घटनेतील तक्रारदार गुलाब केशव पाटील (वय ६०) या तळोजा येथील मजकूर गावात राहण्यास असून ती तळोजा येथील आरएएफ सिग्नल येथून नावडे येथे आरोपी अनंता पालेकर याच्या रिक्षामधून नावडे येथे जात होती. नावडे गावाजवळ रिक्षामध्ये असलेली दुसरी महिला उतरुन गेल्यानंतर रिक्षाचालक पालेकर याने गुलाब पाटील यांना नावडे येथे न उतरवता, त्यांना नावडेच्या पुढे आडमार्गे रेल्वे पटरीच्या बाजुने निर्जन ठिकाणी नेले. त्यानंतर त्याने गुलाब पाटील यांच्या डोक्यामध्ये लाकडी दांडका मारुन त्यांना जखमी केले तसेच त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने आणि मोबाईल फोन असा सुमारे सव्वा तीन लाख रुपये किंमतीचा ऐवज लुटून पोबारा केला होता.

या घटनेनंतर जखमी गुलाब पाटील यांनी काही नागरिकांच्या मदतीने कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेऊन घडल्या प्रकाराची माहिती दिल्यानंतर कळंबोली पोलिसांनी त्यांच्यावर रुग्णालयात उपचार केले. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत धरणे यांच्या सुचनेनुसार पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरु केली.

या तपासणीत आरोपी चालवित असलेल्या रिक्षाचा नंबर मिळाल्यानंतर गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाने तत्काळ आरटीओकडून या रिक्षाची माहिती मिळवली असता हा रिक्षाचामालक पनवेलच्या वळवली गावात राहणारा अनंता पालेकर असल्याचे आढळून आले. त्यानंतर मध्यवर्ती गुन्हे शाखेने आणि कळंबोली पोलिसांनी या आरोपी रिक्षा चालकाच्या मोबाईल लोकेशनवरुन त्याचा माग काढत त्याला रात्री ११च्या सुमारास पनवेलमधून अटक केली तसेच त्याने गुलाब पाटील यांचे लुटलेले सर्व दागिने, रोख रक्कम आणि मोबाईल फोन हस्तगत केले. न्यायालयाने त्याची पोलीस कोठडी ठोठावली आहे.

दरम्यान, अटक आरोपी अनंता पालेकर याने एका पतपेढीकडून कर्ज काढले होते. सदर कर्जाचे हप्ते भरल्यानंतर देखील पतपेढी कडून पैसे वसुलीसाठी त्रास देण्यात येत होता तसेच त्याची रिक्षा जप्त करण्याची धमकी देण्यात येत होती. त्यामुळे अनंता पालेकर घाबरुन रिक्षादेखील चालवत नव्हता. त्याच्या रिक्षामध्ये गुलाब पाटील या अंगावर मोठ्या प्रमाणात दागिने घालून बसल्यानंतर त्याच्या अंगावरील दागिने लुटून पतपेढीचे कर्ज फेडण्याचा विचार त्याच्या डोक्यात आला. त्यामुळे त्याने गुलाब पाटील यांना आडमार्गावर नेऊन त्यांना लुटल्याचे तपासात आढळून आले आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास करण्यात येत आहे.

# चिमुकल्याला शिक्षा करणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई करा

## पनवेलमध्ये हिंदवी सेनेने मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिमुकल्या लहान विद्यार्थ्यांना कठोर शिक्षा देऊन त्यांच्या बालमनावर परिणाम करणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी हिंदवी सेनेने सोमवारी (दि.२१) केली. या वेळी निलेश पाटील यांनी शाळा प्रशासनाला जाब विचारत त्वरीत कारवाई करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी; अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा दिला.

नवीन पनवेल सेक्टर ८ मधील सेंट विलफर्ड किड्स स्कूलच्या पूर्व प्राथमिक विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी अभ्यास केला नाही म्हणून शिक्षकांनी त्यांना अंधाऱ्या खोलीत डांबून ठेवल्याची तक्रार पालकांनी हिंदवी सेनेला केली होती. या पार्श्वभुमीवर हिंदवी सेनेचे निलेश पाटील यांच्यासह सदस्यांनी शाळेला भेट देऊन याचा जाब विचारला तसेच निवेदन देऊन, अशी शिक्षा देणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, आपल्या विद्यालयात अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यामध्ये इंग्रजी माध्यमातून पूर्व प्राथमिक विभागाचे शिक्षण घेणारे विद्यार्थीदेखील शिक्षण घेतात. पालक आपल्या शाळेत मोठ्या आशेने आणि विश्वासाने शिक्षणासाठी पाठवत असतात, मात्र हिंदवी सेनेकडे संघटनेकडे गंभीर स्वरूपातील तक्रारी येऊ लागल्या आहेत.



पूर्व प्राथमिक विभागाच्या पाल्यांना अभ्यास न केल्यामुळे त्यांना एका गडद काळोख असलेल्या अंधाऱ्या खोलीत काही वेळ डांबून ठेवले जात असल्याची तक्रार पालकांनी आमच्याकडे केली आहे. ही शिक्षा जर खरी असेल तर ती बालमनावर परिणाम करणारी आहे. त्यामुळे पाल्यांच्या मनावर दहशत निर्माण होवून ते भविष्यात आपला आत्मविश्वास हरवून टाकतील. ती मुले कायम दहशतीच्या राहून त्यांच्या बुद्धी चातुर्यावरदेखील परिणाम होवू शकतो. त्यामुळे पालकांमध्ये संतापाची भावना आहे. अशी शिक्षा करणाऱ्या शिक्षकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी या निवेदवातून करण्यात आली आहे.

या वेळी निलेश पाटील, संजय मुरकुटे, प्रभाकर बहिरा, गिरीश चव्हाण, बबलू गुप्ता, आकाश धाटे, कृणाल कुरघोडे, अण्णा वाणी, केतन ठाकरे, विशाल सावंत, वैभव आंग्रे, रजत जगे, प्रशांत शेट्टे, केदार भगत, विक्रांत पाटील, संजय कदम, अनिमेश पटवर्धन, रुपेश नागवे, शिल्पा पवार, मित्तल पाटील, अश्विनी मुरबाडकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## निवडक

### दोनशे लिटर डिझेलची चोरी

**पनवेल :** दुधाच्या टँकरमधून दोनशे लिटर डिझेलची चोरी केल्याप्रकरणी चोराविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शिवाजी जाधव हे टँकर (एमएच १३ सीओ ६१८९)वर चालक म्हणून नोकरी करतात. त्यांनी इस्लामपूर एमआयडीसी राजाराम पाटील दूध सहकारी संघटना येथून दूध भरले व तेथील डिझेल पंपावर ३०० लिटर डिझेलदेखील भरले. जवाहर इंडस्ट्री येथे दूध खाली करण्यासाठी ते निघाले. पहाटे तीन वाजता सुविधा कोल्ड स्टोरेज जवाहर इंडस्ट्री, कामोठे येथे पोहोचले. पहाट झाल्यामुळे ते झोपी गेले. त्यांना सकाळी जाग आली असता डिझेलच्या टाकीचे लॉक तुटलेले दिसले. अंदाजे दोनशे लिटर डिझेल चोरट्यांनी चोरून नेले.

### घरफोडीत दागिने चोरले

**पनवेल :** काळुंद्रे येथे चोरांनी केलेल्या घरफोडीत चार लाखांचे दागिने व रोख रक्कम लंपास केली. शहर पोलीस या चोरांचा शोध घेत आहेत. सनी चिखलेकर हे काळुंद्रे येथे राहत असून चोराने दरवाजाचे कडी कोंयड्याचे लॉक तोडले आणि घरात प्रवेश करून बेडरूममधील लोखंडी कपाटाचा दरवाजा वाकवला आणि लॉकरमधील सोन्याचे दागिने, रोख रक्कम असा चार लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

### मृताच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल :** रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्मवर एक युवक बेशुद्ध अवस्थेत आढळला. त्याचा पनवेल उपजिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांच्या नातेवाईकांना शोध पनवेल रेल्वे पोलीस घेत आहेत. मयत व्यक्ती अंदाजे ३० वर्षांची असून उंची ५.५ फूट, अंगाने मध्यम, रंग गहूवर्ण, चेहरा उभट, दाढी वाढलेली आहे. अंगात निळा टिशर्ट, तपकिरी पॅन्ट आहे. या व्यक्तीविषयी कुणाला माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे किंवा ०२२-२७४६७१२२ अथवा ८१०८९७९७६८ येथे संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक एस.जे.वाघमारे यांनी केले आहे.

### आनंद शिंदे यांना डॉक्टरेट पदवी



**पनवेल :** उलवे नोड येथील सामाजिक कार्यकर्ते आनंद शिंदे यांना भारत सेंट्रल फॉर वोकेशनल ट्रेनिंगतर्फे डॉक्टरेट पदवी देण्यात आली आहे. आनंद शिंदे यांचा ऑनररी डॉक्टरेट अवॉर्ड-२०२४च्या नामांकनासाठीचा अर्ज टोलोसा मेक्सिकोच्या छाननी प्राधिकरणाने मंजूर केला आहे. तुमच्या कारकिर्दीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल तुम्हाला हा पुरस्कार प्रदान करताना आम्हाला अत्यंत आनंद आणि अभिमान वाटतो. आम्हाला आशा आहे की, हा पुरस्कार तुम्हाला समाज आणि तुमच्या देशासाठी योगदान देण्यास बळ देईल, असे भारत सेंट्रल फॉर वोकेशनल ट्रेनिंगतर्फे देण्यात आलेल्या पत्रात म्हटले आहे. आनंद शिंदे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# आमदार महेश बालदी यांच्या कार्याचे कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

**उज्ज्वल वेल**फेअरचे संस्थापक आणि उन्नती असोसिएशनच्या मुख्य समितीचे विश्वस्त देवालय मित्रा यांनी नुकत्याच झालेल्या दुर्गापूजेच्या निमित्ताने आमदार महेश बालदी यांचे काम, समस्यांचे समाधान आणि लोकांसाठी केलेल्या सेवेबद्दल प्रशंसा केली.



समुदायाला संबोधित करताना देवालय मित्रा यांनी आमदार महेश बालदी यांचा संदेश त्यांनी पोहचवला. यामध्ये तीन मुद्द्यांना प्राधान्य दिले जाईल. उलवे येथून ट्रेनची वारंवारता वाढवणे, चांगले रस्ते आणि पुढील काही महिन्यांत उद्यान विकास यावर काम केले जाईल, असे आमदार बालदी म्हणाले असल्याचे मित्रा यांनी सांगितले. यासोबतच देवालयजींनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूरजींचेही मदत आणि सामुदायिक सेवांसाठी कौतुक केले.

# सारडे गावाच्या हद्दीत आढळला मृतदेह

**उरण : प्रतिनिधी**

सारडे वशेणी रस्त्यावर मृतदेह आढळण्याचे प्रमाण दिवसागणिक वाढत आहे. सोमवारी सकाळी एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सारडे वशेणी रस्त्यावर आढळून आल्याने उरण तालुक्यात खळबळ माजली.

या घटनेची माहिती तत्काळ उरण पोलिसांना देण्यात आली. पोलीस घटनास्थळी दाखल झाले व मृतदेह ताब्यात घेऊन अधिक तपास करण्यात येत आहे.

उरण तालुक्यातील सारडे वशेणी रस्त्यावर एक अज्ञात व्यक्तीचा मृतदेह पहाटेच्या सुमारास आढळून आला. या घटनेची माहिती तात्काळ उरण पोलिसांना दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

अधिक तपासात संबधित व्यक्तीचे नाव शिवाजी मुरलीधर बोबडे (वय ४०) अशी माहिती मिळाली आहे. दारू प्यायल्याने चक्कर आल्यानंतर हा मृत्यू झाला असावा असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे संबधित व्यक्तीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. या प्रकरणी उरण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक खाडे हे अधिक तपास करीत आहेत.

# उरण महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील जीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभाग व गोपाल कृष्ण वाचनालय देऊळवाडी उरण यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा हे होते. विद्यार्थ्यांनी योग्य पुस्तकांची निवड करून वाचन केले पाहिजे व आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. उरणमधील गोपाळकृष्ण वाचनालयाच्या ग्रंथपाल जिजा घरत यांनी स्वतःच्या जीवनातील संघर्ष सांगून वाचनामुळे यशस्वी झाल्याचे सांगितले.

ग्रंथपाल शाम धारासुरकर यांनी ग्रंथालयाचे प्रकार सांगून महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. राजेश शहा संबोधित केले. आय क्यू ए.सी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनातील उदाहरणे विशद केली. अमिना खान हिने डॉ. कलाम यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला तर तनिष्का पाटील व डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी वाचन केले.

प्रास्ताविक डॉ.एच.के. जगताप यांनी केले तर स्वागत व परिचय डॉ. पराग कारुलकर यांनी केला. सूत्रसंचालन आरती पाटीलने केले. आभार कार्यक्रमाचे संयोजक तथा अजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रमुख प्रा.व्हि. एस. इंदुलकर यांनी मानले.

कार्यक्रमासाठी प्रा.हन्नत शेख, प्रा.विनिता तांडेल, प्रा. पूजा गुप्ता व प्रा. सौ निलोफर मुकरी यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमात वृषाली पाठारे, डॉ. एम.जी. लोणे व महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



# वीर वाजेकर महाविद्यालयात मतदान यंत्र प्रशिक्षण

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय महालण विभाग फुंडे येथे महाराष्ट्र विधानसभा निवडणूक (२०२४) निमित्ताने मतदान यंत्र प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रम महाविद्यालयाच्या निवडणूक साक्षरता मंडळ व तहसील कार्यालय उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उत्साहात झाला.



महाविद्यालयातील विद्यार्थी व परिसरातील नागरिकांना मतदान केंद्रातील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची कार्यपद्धती व त्याची उपयुक्तता याबाबत तहसील कार्यालयातील कविता माने यांनी माहिती सांगितली.

प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी महाविद्यालय दरवर्षी नियमितपणाने नव मतदारांची नोंदणी तसेच राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने व विविध निवडणुकांच्या काळातील राज्यशास्त्र व निवडणूक साक्षरता मंडळाद्वारे राबविण्यात आलेल्या मतदार जागृती अभियानाबाबतची माहिती दिली.

प्रास्ताविक राज्यशास्त्र व निवडणूक साक्षरता मंडळाचे प्रमुख डॉ. संदीप घोडके यांनी तर आभार राष्ट्रीय सेवा योजनाचे प्रमुख राम गोसावी यांनी मानले. कार्यक्रमाकरिता उपप्राचार्य डॉ. विलास महाले, महाविद्यालयातील ELC, NSS, DLLE प्रमुख डॉ. सोनवले, सांस्कृतिक प्रमुख डॉ. सुजाता पाटील, विद्यार्थी संसद प्रमुख गायकवाड व सर्व शिक्षक शिक्षकेतर सेवकांनी मेहनत घेतली.

उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी मतदान यंत्र व प्रशिक्षक स्टाफ महाविद्यालयात उपलब्ध करून सहकार्य केले. मतदार जागृतीसाठी रॅलीचे व इतर उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# घुबडाच्या पिल्लाला जीवदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील संजीव काळकर यांनी कुटुंबीय व इतरांच्या मदतीने घुबडाच्या पिल्लाला जीवदान दिले आहे.

काळकर यांच्या घरी सोमवारी (दि.२१) काही कावळे व एक मांजर आवाज करत घुबडाच्या पिल्लाला घेरून होते. हे पाहताच त्याला काळकर यांनी उचलले व घरातील सर्वांनी घुबडाच्या पिल्लाला वाचवायचे ठरवले. त्यानुसार त्यांनी अनेकांना मदतीसाठी फोन केले. महापालिकेचे वैभव विधाते, वनाधिकारी अशोक घुगे, त्यांचे परिचित सहकारी संतोष उद्रे, स्वच्छता उपक्रमासाठी नित्य ग्लोव्हज व मास्क देणारे जयेश कांबळे, शेजारी व पक्षीप्रेमी विदित पेणकर, बहीण श्री. व सौ. सोनाली व महेश डोणगावकर, भाऊ व वहिनी व मुलगी सायली काळकर, रामप्रहर दैनिक कर्मचारी या सर्वांच्या मदतीने एका घुबडाच्या पिल्लाला वाचविण्यात आले.



# 'रोटरी'तर्फे सायकलींचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी खारघर मिडटाऊन क्लबतर्फे मुर्बी जिल्हा परिषद शाळेतील आणि बेलपाडा येथील जिल्हा परिषद शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना सायकल दान हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला.

अध्यक्ष आरटीएन शैलेश पटेल, प्रथम महिला आरटीएन दीपा पटेल, सेवा प्रकल्प संचालक आरटीएन डॉ. रविकिरण, ज्येष्ठ रोटेरियन यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. खारघरमध्ये रिजन्सी क्रेस्ट सोसायटीचे सचिव विशाल अग्रवाल आणि सोसायटीचे इतर सदस्य ही उपस्थित होते. विद्यार्थ्यांसह दोन्ही शाळेतील शिक्षकही उपस्थित होते.

गरजू विद्यार्थ्यांना एकूण २० सायकली दान करण्यात आल्या. गरजू विद्यार्थ्यांनी आणि शाळेचे प्राचार्य यांनी रोटरी खारघर मिडटाउनचे आभार मानले.



# प्राचार्य निशा नायर यांचा पुरस्काराने गौरव

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य निशा नायर यांना Acevision & Edutreeतर्फे दिल्या जाणाऱ्या Architect of Future Mindset 2024या पुरस्काराने गौरविण्यात आले.

Courtyard of by Mariott या पंचतारांकित हॉटेलमध्ये सोहळा झाला. हा पुरस्कार प्रामुख्याने जी व्यक्ती भविष्यातील शिक्षण आणि नवोप्रकमाला प्रोत्साहन देते, अशा व्यक्तींना दिला जातो. प्राचार्य निशा नायर यांना शैक्षणिक क्षेत्रात काम करण्याचा १९ वर्षांचा अनुभव असून त्यांनी विविध शैक्षणिक संस्थामध्ये महत्वाचे कार्य केले आहे. शिक्षण क्षेत्रात विविध उपक्रम राबवून संस्था व विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये हातभार लावला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन आत्तापर्यंत विविध नामांकित संस्थांनी पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी.देशमुख, सचिव डॉ. एस.टी.गडदे, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी यांनी अभिनंदन व कौतुक केले. त्याचबरोबर सर्व शिक्षकवृंदाने शुभेच्छा दिल्या.



## संपादकीय

# आघाडीत रस्सीखेच सुरूच

राज्यातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊन चारपाच दिवस उलटल्यावरही महाविकास आघाडीतील शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस पक्षात जागावाटपावरून रस्सीखेच सुरूच असून मतदानाला महिनाभराहून कमी कालावधी उरलेला असताना त्यांच्यातील जागावाटपाचा गुंता काही सुटताना दिसत नाही. भारतीय जनता पक्षाने मात्र अपेक्षेप्रमाणे उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आघाडी घेतली आहे.

**विधानसभा निवडणुकीसाठी विरोधकांच्या महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला अशी आवई महिनाभरापूर्वीच उठवल्यानंतर, आता या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊन चारपाच दिवस झाले असले तरी आघाडीमधील कुरबुरी काही संपण्याचे नाव घेताना दिसत नाहीत. मुळातच जनतेच्या सेवेच्या उदात्त हेतूऐवजी निव्वळ स्वार्थी सत्ताकारणातून हे अहंकारी पक्ष एकत्र आल्यामुळे त्यांच्यात सत्तेचे लोणी कोणी, किती आणि कसे ओरबडून खायचे यावरून साठमारी सुरूच आहे व त्यामुळेच या आघाडीतील जागावाटपाचा तिढाही अद्याप कायम आहे असे दिसते. मागील म्हणजे २०१९च्या विधानसभा निवडणुकीत खरे तर महाराष्ट्रातील जनतेने भाजप व तेव्हाची अखंड शिवसेना यांच्या युतीला स्पष्ट जनादेश दिला होता, परंतु केवळ सत्तेसाठी उद्धव ठाकरे यांनी या सुस्पष्ट जनादेशाकडे पाठ फिरवत, काँग्रेस पक्ष आणि शरद पवार यांचा तेव्हा अखंड असलेला राष्ट्रवादी पक्ष यांच्याशी हातमिळवणी केली. या अभद्र आघाडीत समान दुवा असा तेव्हाही नव्हताच. त्यांच्या अडीच वर्षांच्या सत्ताकालावधीतही त्यांच्या आघाडीपेक्षा 'बिघाडी'चेच दर्शन त्यामुळे अधिक घडले. स्वाभाविकच मविआच्या राजवटीत राज्यातील जनतेच्या भल्याच्या दृष्टीने काहीही कामे झाली नाहीत. सुस्पष्ट जनादेश नाकारून राज्यावर लादल्या गेलेल्या त्या आघाडी सरकारची मोठी किंमत राज्याने चुकवली. मुळात आघाडीचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी साधे मंत्रालयात येऊन काम करण्याचेसुद्धा जिथे टाळले, तिथे त्यांच्या सरकारकडून आणखी कुठल्या स्वरूपाच्या कार्यशैलीची अपेक्षा करता येणार? कोविड महामारीच्या काळात अधुनमधुन फेसबुक लाइव्हमधून टोमणे मारण्याचे व दर्पोक्ती करण्याचे काम तेवढे झाले. हे असे नेतृत्व महाभकास आघाडीच्या सरकारला लाभल्यावर जे व्हायचे तेच झाले. ना राज्यात कुठली गुंतवणूक आली, ना कुठले नजरेत भरण्यासारखे प्रकल्प उभे राहिले. तरीही आताची निवडणूक जाहीर होण्याच्याही आधीपासून उबाठा गटाकडून व स्वत: उद्धव ठाकरे यांच्याकडून पुन्हा-पुन्हा 'मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करा' ही मागणी होत राहिली. आघाडीतील ज्येष्ठ आणि जाणत्या नेत्यांनी त्यांना आघाडीधर्म शिकवण्याचा प्रयत्न वारंवार केला, परंतु तरीही त्यांचा मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्यासाठीचा आग्रह अधुनमधुन डोके वर काढतच असतो. हरियाणातील भाजपच्या जोरदार यशामुळे नैराश्याने झाकोळल्या गेलेल्या काँग्रेस पक्षाला घेरण्याची संधीही उबाठा गटाने अजिबात सोडली नाही. उबाठाचे संजय राऊत यांनी तर काँग्रेसला थेट स्वबळावर निवडणूक लढवण्याचे आव्हानच देऊन टाकले. तेव्हा सुरू झालेला संजय राऊत आणि काँग्रेसचे नाना पटोले यांच्यातील कलगीतुरा अजुनही सुरू आहे. जागावाटपावरून ज्यांच्यात अशी जुंपते, ते एकजुटीने राज्याचा गाडा कसा हाकू शकतील असा प्रश्न जनतेला पडणे स्वाभाविकच आहे. मुळात सत्तेसाठी मुस्लिमांचे लांगुलचालन करणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या वळचणीला उबाठा गट बसूच कसा शकतो हा मोठा प्रश्नही राज्यातील स्वाभिमानी हिंदू जनतेला पडतो आहेच. जागावाटपाच्या तिढ्यामुळे आघाडीतील मतभेद चव्हाट्यावर आल्याने जनतेला राज्याच्या हिताच्या दृष्टीने महायुतीलाच पुन्हा कौल देणे सोपे जाणार आहे.**

# सर्वात निस्वार्थ प्रेम म्हणजे आईची माया!



आईच्या प्रेमाला तोड नाही हे जगजाहीरच आहे. हे वेळो वेळी सिद्धसुद्धा झालेले आहे. प्रत्येक आईला आपले मुल हे जीव की प्राण असत. आई ही प्रेमापोटी आपल्या अपत्यासाठी कुठला पण त्याग करण्यासाठी सदैव तयार असते. मग ती कुठल्याही वयात का असेना, किती गरीब किंवा श्रीमंत असेना. आईच्या प्रेमाला कुठलीही सीमा नसते. सर्वात निस्वार्थ प्रेम जर असेल तर ते आईचेच असते. तिथे कुठलाही स्वार्थ नसतो. ती कुठलाही नफा किंवा तोटा बघत नाही. तिला फक्त आपल्या मुलावर प्रेम करणे हेच माहित असते.

आईचा त्याग हा या विश्वात सर्वात मोठा त्याग आहे. त्याला कुठलीही तोडच नाही. खरं प्रेम कोणतं असत, ते कस असत ते आईचच असतं. प्रेम कस करावं हे शिकायचं असेल तर ते आई कडूनच शिकले पाहिजे. आई ही प्रेम कसे करावे ह्याची जिती जागती कार्यशाळा आहे.

हे उगीच थोडे म्हटले आहे की, स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी म्हणजे काय तर तो कितीही श्रीमंत असला किंवा राजा जरी असला आणि त्याला जर आई नसेल किंवा आईचे प्रेम मिळाले नसेल तर तो चक्क भिकारी आहे. एवढे मोल ह्या आईच्या प्रेमात आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील हिरकणीची गोष्ट सर्वांना माहीतच आहे. त्याकाळी सगळीकडे गडकिल्ले आणि परकोट होते. सुरक्षेच्या दृष्टीने संध्याकाळी गडकिल्ले आणि परकोटाची दरवाजे बंद केल्या जायचे. जो काही नागरिकांना व्यवहार करावयाचा असे तो दिवसभरात करावयाचा असे. संध्याकाळी सर्व दरवाजे बंद व्हायचे आणि त्यानंतर कोणालाही गडकिल्ल्यात आणि परकोटात दिवस निघेपर्यंत प्रवेश मिळत नसे. त्या व्यक्तीला ताटकळत बाहेरच सकाळ होइपर्यंत वाट बघावी लागे. असे कडक नियम जनतेच्या सुरक्षेसाठी असत.

एके दिवशी एक गवळण रायगडाच्या खाली काही अंतरावर असलेले वाकुसरे (वाळूसरे) या गावात राहत होती. दुध विकण्यासाठी ती रायगड किल्ल्यावर सकाळी गेली. तिला लहान बाळ होते. त्या बाळाला तिने पाळण्यात टाकले आणि दुध विकायला निघून गेली, परंतु ह्या गवळणीला दुध विकायला वेळ झाला. खूप संध्याकाळ झाली आणि परत पोहचेपर्यंत किल्ल्याचे दरवाजे बंद झाले होते. ती गवळण द्वारपालाला विनवण्या करू लागली की द्वार उघडा माझे लहान बाळ घरी एकटेच आहे, परंतु द्वारपाल आदेशाने बांधल्या गेला होता. त्याला सक्त ताकीद देण्यात आली होती की, संध्याकाळी अंधार पडल्यावर काहीही झाले तरी किल्ल्याचे द्वार उघडायचे नाही. एव्हढ्या गवळणीने विनंती करून सुद्धा द्वारपालाने द्वार उघडले नाही. शेवटी ती विनवण्या करून कंटाळली. तिच्या डोक्यात एकच चक्र चालू होते की, माझे बाळ रात्रभर कसे राहील? ते उपाशी राहील, त्याला भुक लागली असेल. माझी आठवण म्हणुन ते रडत राहील. ह्या गवळणीला सतत आपल्या बाळाचीच चिंता लागून राहिलेली होती.

शेवटी ही आई होती आणि आपल्या बाळासाठी काहीपण करण्याचा जो गुणधर्म आहे तो तिच्यात होता. ती हिम्मतवाली होती. तिने हिम्मत केली आणि शेवटी ४४०० फुट उंची असलेला गड ती काळ्याकुट्ट अंधारामध्ये दऱ्या, दाट झाडे-झुडपे असूनही उतरली आणि आपल्या बाळाजवळ पोहचली.

गडकिल्ले चढणे आणि उतरणे म्हणजे एव्हढे सोपे नव्हते. रात्रीची वेळ, अंधार, कितीतरी खडतर प्रवास, दगड, धोंडे, मोठे मोठे खडक, झाड झुडूपं, जंगलाने व्यापलेले, साप, विंचू काटे आणि इतर हिंस्त्रप्राण्याची भीती सुद्धा होती. ह्या सर्व अडथळ्यांची पर्वा न करता स्वतःचा जीव धोक्यात टाकून ही गवळण आपल्या बाळाजवळ सुरक्षित पोहचली. कशासाठी तर एकमेव उद्देश तो म्हणजे कोणासाठी तर बाळासाठी.

एव्हढा मोठा पराक्रम ह्या आईने आपल्या बाळासाठी केला. जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांना ही बातमी कळली तेव्हा महाराजांनी ह्या हिरकणीचे कौतुक केले. ज्या बुरुजावरून ती चढली होती त्या बुरुजाला तिचे नावसुद्धा दिले तसेच तिचा साडी चोळी देऊन सन्मान करण्यात आला. अशा अनेक हिरकणी जगात आहेत. त्या अहोरात्र आपल्या बाळांसाठी राबत असतात, कष्ट घेत असतात, काळजी घेत असतात व निर्स्वार्थपणे प्रेम करत असतात.


हे झाले इतिहासातील उदाहरण. हे सगळं आठवण्याचं कारण की, माझ्या सोबत घडलेली घटना. माझे वय ६१ वर्ष. माझ्या आईचे वय असेल ८२ वर्ष. मी घरीच प्लॅस्टिकच्या खुर्चीवर बसलो होतो. बाजुला आई उभी होती. अचानक ती प्लॅस्टिकची खुर्ची तुटली आणि मी पडलो व त्याच प्लॅस्टिकच्या खुर्चीत फसलो. मला उठता येईना. मला बाजुला धरायला सुद्धा काही नव्हते. आई एकदम घाबरली. आता माझे वजन ९० किलो. आईचे वजन फक्त ३० किलो. एव्हढे असुनसुद्धा ती मला उचलत होती आणि मोठमोठ्याने घरात आवाज देत होती. मग दोघी आल्या आणि त्यांनी मला आधार दिला व मी उठलो, पण त्यावेळची आईची तळमळ कासाविसता बघून मी खुपच प्रभावित झालो की एक आई आपल्या मुलाकरिता किती जीव लावते. तिने माझे लगेच कान फुंकले. मागे डोक्याला हात लावला. बेंड आले का ते बघितले. लगेच गळ्यात पडली. पाणी आणले. डोक्यावरून सतत हात फिरवीत होती. मी तिला विश्वास देत होतो की बाई मला काही झाले नाही, परंतु ती काही ऐकायला तयार नव्हती. दवाखान्यात जा म्हणू लागली. आराम करा, डोक्याला बाम, अमृतांजन लावा वगैरे वैगरे.

मी लहान मुलासाठी ही धावपळ समजू शकतो. परंतु एका ६१ वर्षाच्या पुरुषासाठी (मुलासाठी)सुद्धा तेच प्रेम, तिच माया, तोच जिव्हाळा तेच वात्सल्य. दिवसभर मला कुठेही जाऊ दिले नाही. मी झोपल्यावर ती खोलीत परत आली. माझ्या अंगावर टाकले. मच्छरदाणी चारही बाजूने खोचलेली अगोदरच होती, परंतु तिने परत नीट लावलेली आहे की नाही ही खात्री करून परत चारही बाजूने खोचली.

रात्रभर चकरा मारत होती आणि मला बघत होती. बिचारी माउली माझ्यासाठी ती रात्रभर झोपली नाही. माझ्याच काळजीत होती. कुठून येत हे सर्व ममत्व ? काय जादू आहे न आईच्या प्रेमात. ते खरचं म्हटले आहे की, स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी ह्या उक्तीची मला आठवण झाली.

मी हे सर्वांना सांगत होतो तर त्यांना सुद्धा आश्चर्य वाटत होते व म्हणत होते की, तुम्ही खरोखर भाग्यवान आहात तुम्हाला आईचे प्रेम मिळते. खरोखर मला सर्वात भाग्यवान व श्रीमंत असल्याचे वाटले. हे असे आईचे प्रेम सर्वांना मिळो अशी मी मनोकामना व्यक्त करतो व ह्या कृत्रिमरुपी स्वार्थी जगात खरा ममवत्वाचा झरा कायमरूपी वाहत राहो. सर्वांचे मंगल हो. धन्य ती आई आणि तिचे वात्सल्य.

**-अरविंद मोरे, नवीन पनवेल**



## बदलते तंत्रज्ञान

# सिमकार्डशिवाय डेटा, कॉलिंगची सुविधा मिळणार

तुम्ही सिमकार्डशिवाय डेटा, कॉलिंगची सुविधा मिळवू शकता. त्यासाठी ही बातमी सविस्तर वाचा. 'Viasat'ने BSNL च्या सहकार्याने डायरेक्ट टू डिव्हाइस सॅटेलाईट कनेक्टिव्हिटीची यशस्वी चाचणी घेतली. ही चाचणी भारतासाठी अभिमानाची बाब बनली आहे.




Viasat ने केलेली ही चाचणी दुतर्फा आणि SOS संदेश देणारी होती. हे व्यावसायिक अँड्रॉइड स्मार्टफोनवर केले गेले. एनटीएन कनेक्टिव्हिटीसाठी हे करण्यात आले होते. चाचणीदरम्यान ३६ हजार किलोमीटर अंतरावरून त्याचा प्रसार करण्यात आला. Viasat सॅटेलाईट नेटवर्कचा वापर करून सेल फोन कनेक्टिव्हिटी सुरू केली जाते आणि त्याच्याशी सहज कनेक्ट केले जाऊ शकते, असे या निष्कर्षातून दिसून आले आहे. विशेष म्हणजे याचा वापर व्यवसायासाठीही होऊ शकतो.

**सर्व डिव्हाइसेस कनेक्ट करणं शक्य**

डायरेक्ट-टू-डिव्हाइस कनेक्टिव्हिटी हे एक नवीन तंत्रज्ञान आहे जे मोबाइल फोन, स्मार्टवॉच किंवा कार- औद्योगिक मशिनरी आणि ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्सला उपग्रह नेटवर्कशी कनेक्ट होण्यास मदत करते. हे सर्व डिव्हाइसेस कनेक्ट करण्यास मदत करते, विशेष म्हणजे आपण ते कोठूनही कनेक्ट करू शकता.

Viasat चे म्हणणे आहे की, 'बीएसएनएलसोबत भागीदारी केल्यानंतर आम्हाला चांगले नेटवर्क देणे सोपे झाले आहे. त्याचा वापर एखाद्या व्यक्तीसाठी, डिव्हाइससाठी किंवा वाहनासाठी केला जाईल की नाही हे महत्त्वाचे नाही. अशा तऱ्हेने भारतासाठी हे अतिशय खास नेटवर्क ठरणार आहे, असे म्हणता येईल.

बीएसएनएलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक रॉबर्ट जे रवी म्हणाले, बीएसएनएलला Viasat सोबत विशेष भागीदारीत डायरेक्ट-टू-डिव्हाइस इनोव्हेशनचे नेतृत्व करताना अभिमान वाटतो. बीएसएनएल नेटवर्क आणि व्हायसॅटच्या एल-बँड सॅटेलाईट समूहाचा वापर करून भारतातील महत्त्वाच्या सेवा, आपत्ती पुनर्प्राप्ती आणि अगदी ग्रामीण कनेक्टिव्हिटीसाठी थेट दळणवळण वाढविण्याची क्षमता आजच्या यशस्वी प्रात्यक्षिकातून दिसून येते.

दरम्यान, डायरेक्ट-टू-डिव्हाइस कनेक्टिव्हिटी या नव्या तंत्रज्ञानाचा विविध क्षेत्रात फायदा होऊ शकतो. हे तंत्रज्ञान मोबाइल फोन, स्मार्टवॉच किंवा कार- औद्योगिक मशिनरी आणि ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्सला उपग्रह नेटवर्कशी कनेक्ट होण्यास मदत करते.

# साहित्यिक ना. सी. फडके



## निमित्त

नारायण सीताराम फडके हे युगप्रवर्तक मराठी कादंबरीकार, कथाकार, मराठी लघुनिबंधाचे आद्य प्रवर्तक आणि साहित्य समीक्षक. आज त्यांचा स्मृतीदिन आहे.

त्यांचा जन्म ४ ऑगस्ट १८९४ रोजी नगर जिल्ह्यातील कर्जत याठिकाणी झाला. त्यांचे वडील सीताराम फडके हे वेदान्ती होते. वेदान्तनिदर्शन (१९१३) हा व्यासंगपूर्ण ग्रंथ त्यांनी लिहिला आहे. फडक्यांचे प्राथमिक शिक्षण वडूज (जि. नासिक), बार्शी (जि. सोलापूर), पुणे अशा वेगवेगळ्या ठिकाणी, तर माध्यमिक शिक्षण पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयात आणि महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन कॉलेजात झाले. १९१७ साली ते एम.ए. झाले. तत्पूर्वीच, १९१६ मध्ये न्यू पूना कॉलेजात (आजचे स. प. महाविद्यालय) प्राध्यापक झाले.

'मेणाचा ठसा' ही फडके यांची पहिली कथा केरळ कोकिळ ह्या मासिकात प्रसिद्ध झाली (१९१२). 'अल्ला हो अकबर!' (१९१७) ही त्यांची पहिली कादंबरी. मारी कोरेली ह्या इंग्रज कादंबरीकर्तीच्या टेंपरल पॉवर ह्या कादंबरीच्या आधारे ती लिहिलेली आहे. त्यानंतर त्यांनी अनेक कथा आणि कादंबर्या लिहिल्या. मात्र, कादंबरीलेखन हे त्यांचे विशेष कर्तृत्वाचे क्षेत्र ठरले. कला ही कलेसाठीच असते वाचकांना सौंदर्यदर्शन घडविणे व आल्हाद देणे हेच कादंबरीकाराचे प्रमुख कार्य, ह्या भूमिकेतून त्यांनी प्रमाणबद्ध, आटोपशीर आणि लाघवयुक्त कादंबर्यांचे एक युगच मराठीत सुरू केले. 'कुलाब्याची दांडी' (१९२५), 'जादूगार' (१९२८), 'दौलत' (१९२९), 'अटकेपार' (१९३१), 'निरंजन' (१९३२) ह्या त्यांच्या आरंभीच्या कादंबर्यांतील प्रणयरम्यता, कुशल, सफाईदार व्यक्तिरेखन, चतुर संवाद आणि मोहक भाषाशैली ह्या गुणांनी वाचकांच्या मनांची पकड घेतली.

त्यानंतरच्या 'उद्धार' (१९३५), 'प्रवासी' (१९३७), 'अखेरचं बंड' (आवृ. दुसरी, १९४४) ह्या महत्त्वाच्या कादंबर्यांतून प्रणयरम्यतेला त्यांनी गंभीर विषयांची जोड दिली आणि महाराष्ट्रातील काही असामान्य व्यक्तिमत्त्वांचे दर्शन त्यांतून घडविले. तथापि हे करीत असताना कल्पितालाही त्यांनी वाव दिला आणि ह्या कादंबर्या 'चरित्रात्मक' होऊ दिल्या नाहीत. गेल्या पन्नास-साठ वर्षांतील महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक घडामोडींचा उपयोग त्यांनी आपल्या पुढील कादंबर्यांतून पार्श्वभूमीसाठी करून घेतला. 'बेचाळीसचे पत्रीसरकार' (झंझावात, १९४८), 'काश्मीरचे स्वातंत्र्योत्तर राजकारण' (जेहम, १९४८), 'गोवामुक्तीचे आंदोलन' (उजाडलं ! पण सूर्य कुठे आहे? १९५०) अशा काही कादंबर्या त्या दृष्टीने उल्लेखनीय आहेत.

'ऋतुसंहार' (१९५८), 'कुहू ! कुहू !' (१९६०), 'ही का कल्पद्रुमांची फळं?' (१९६१), 'एक होता युवराज' (१९६४) ह्या त्यांच्या नंतरच्या कादंबर्यांपैकी काही होत. सखोल, अनाकलनीय, गूढ व झपाटून टाकणारे जीवनानुभव फडके ह्यांच्या कादंबर्यांतून प्रत्ययास येत नाहीत, तथापि कांदबरी लेखनाबाबत त्यांनी स्वीकारलेल्या भूमिकेशी आणि लेखनतंत्राशी त्या नेहमीच सुसंगत राहिल्या. त्यांच्या काही कादंबर्यांचे आणि कथांचे इंग्रजी आणि इतर भारतीय भाषांतून अनुवादही झालेले आहेत. कलंक शोभा (१९३३) ह्या त्यांच्या कादंबरीवरून मराठी चित्रपटही काढण्यात आला होता. फडके यांची तंत्रनिष्ठ कलादृष्टी त्यांच्या कथांतून मोठ्या प्रमाणात दिसते. त्यांच्या कथांचे पंचविसांहून अधिक संग्रह प्रकाशित झालेले असून, त्यांच्या काही प्रातिनिधिक कथा बावनकशी (१९६२) ह्या नावाने संग्रहीत केलेल्या आहेत. अशा या महान साहित्यिकाचे २२ ऑक्टोबर १९७८ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**खारघर : पर्यटकांना आकर्षित करणारा पांडवकडा धबधबा परिसर सध्या निसर्ग सौंदर्याने नटला आहे.**

## आरोग्य प्रहर

# पीसीओएस, लठ्ठपणाबाबत गैरसमज जाणून घ्या...

पॉलिसिस्टिक ओव्हेरियन डिसिज (पीसीओडी) आणि लठ्ठपणा याबाबत असलेले समज व गैरसमज खालीलप्रमाणेआहेत.



**१. गैरसमज :** पीसीओडीसाठी लठ्ठपणा हे एकमेव कारण आहे.

**वास्तव :** पीसीओडीसाठी लठ्ठपणा हा एक जोखीम घटक असला तरी, हे एकमेव कारण ठरत नाही. पीसीओडीही सामान्य वजनाच्या स्त्रियांनादेखील प्रभावित करू शकते. पीसीओडीच्या विकासामध्ये अनुवंशिकता, इन्सुलिन प्रतिरोधकता आणि हार्मोनल असंतुलन महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

**२. गैरसमज :** पीसीओडी असलेल्या सर्व महिलांचे वजन वाढते

**वास्तव :** पीसीओडी असलेल्या महिला लठ्ठ असतीलच असे नाही. सामान्य किंवा कमी बीएमआय असलेल्या अनेक स्त्रियांना ही समस्या असू शकते. लठ्ठपणामुळे लक्षणे आणखी बिघडू शकतात; परंतु सामान्य वजनाच्या स्त्रियांमध्येही पीसीओडीची लक्षणे दिसून येतात.

**३. गैरसमज :** वजन कमी झाल्यास पीसीओडी बरा होईल.

**वास्तव :** वजन कमी केल्याने लक्षणे कमी होण्यास मदत होते; परंतु ते पीसीओडी हा आजार बरा करू शकत नाही. जीवनशैलीतील बदल हे त्याची लक्षणे नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात.

**४. गैरसमज :** पीसीओडीमध्ये वजन हे फक्त जास्त खाण्याने वाढते.

**वास्तव :** पीसीओडी असलेल्या महिलांना अनेकदा इन्सुलिनच्या प्रतिकाराचा सामना करावा लागतो, ज्यामुळे वजन कमी करणे आव्हानात्मक होते आणि निरोगी आहारानेही वजन वाढू शकते. हार्मोनल असंतुलनदेखील यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते, जे जास्त न खातादेखील वजन वाढवते.

**५. गैरसमज :** पीसीओडी असलेल्या महिला सहज वजन कमी करू शकतात.

**वास्तव :** इन्सुलिन प्रतिरोध आणि हार्मोनल समस्यांमुळे पीसीओडी असलेल्या स्त्रियांसाठी वजन कमी करणे इतरांपेक्षा जास्त आव्हानात्मक असते. त्यांचे वजन नियंत्रित करण्यासाठी त्यांना विशिष्ट आहार योजना आणि व्यायामासारख्या उपचारांची आवश्यकता भासते. लठ्ठपणाशी संबंधित प्रकरणांमध्ये रोगाच्या टप्प्यावर अवलंबून औषधे, एंडोस्कोपिक पर्याय किंवा बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया यासारखे वजन कमी करण्याच्या पर्यायांचा विचार केला जातो.

# खालापुरात चिखलात भातकापणी

## ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी



**चौक : प्रतिनिधी**

परतीच्या पावसाने खालापूर तालुक्यातील अनेक शेतकरी संकटात सापडले आहेत. गेले काही दिवस धुवांधार पावसाने थैमान घातल्याने हातातोंडाशी आलेले भातपिक पाण्यात तरंगत असून त्याची कापणी चिखलात केली जात आहे.


गेली चार-पाच दिवस सायंकाळची हजेरी पाऊस लावत आहे. वावंढळ, चौक, हातनोली, भिलवले, पाली, आसरे, जांभीवली, कलोते, विणेगाव, कांढरोली, धारनी, तुपगाव या गावांतील शेतकरी संकटात आहे. सतत पडणाऱ्या पावसातदेखील भातपिक चांगले बहरले होते. यंदा चांगले पिक आहे, या आनंदात असतानाच परतीच्या पावसाने जोरदार थैमान घातले आणि उभे पीक शेतकऱ्यांच्या डोळ्यासमोर आडवे झाले. लावणीसाठी शेतात चिखल केला जातो, तसा चिखल आता शेतात आहे. त्याच चिखलात शेतकरी भातकापणी करतानाचे विदारक चित्र चौक परिसरात दिसत आहे.

अनेक शेतकऱ्यांनी शेतात भरलेले पाणी जाण्यासाठी पाट केले आहेत. जवळपास सर्वच शेतात चिखल असल्याने हे भात कापून सुकत तरी कुठे घालायचे? असाही प्रश्न निर्माण झाला आहे. मुंबई-पुणे रस्त्याच्या कडेला असणाऱ्या शेतकऱ्यांनी भात रस्त्याच्या कडेला ठेवल्याचे दिसून येते आहे. त्यामुळे सरकारने पाहणी करून ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी प्रगत शेतकरी हरीश पाटील यांनी केली आहे. विधानसभा निवडणूक जाहीर झाली असल्याने सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी निवडणूक कामात व्यस्त असले तरी त्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे तातडीने करावे, अशी मागणी प्रदीप गोंधळी आणि रामदास काईनकर यांनी केली आहे.

### तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश

***तत्काळ शेतीचे नुकसानीचे पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याचे निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी सांगितले. खालापूर तालुक्यात १९६ हेक्टर भातपीक आणि इतर पिकांचे नुकसानीचा प्राथमिक अंदाज आहे, असे तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर यांनी सांगितले.***

## भाजप अलिबाग निवडणूक समन्वयकपदी अ‍ॅड. महेश मोहिते



**अलिबाग : प्रतिनिधी**

भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते यांची पक्षाकडून अलिबाग विधानसभा निवडणुकीसाठी समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

महायुतीमधील घटक पक्षात सुसंवाद आणि समन्वय रहावा यासाठी अ‍ॅड. मोहितेंवर भाजपकडून समन्वयकपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. शिवसेनेकडून विजय पाटील, तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून हर्षल पाटील हे समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. निवडणुकीत महायुतीमधील तीनही घटक पक्षात समन्वय रहावा यासाठी या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

निवडणुकीबाबतचे नियोजन करून दर आठवड्याला कामकाजाची माहिती प्रदेश कार्यालयाला देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## 'युनायटेड वे'कडून अंभेरपाडा येथे बंधारा

**कर्जत : प्रतिनिधी**

युनायटेड वे संस्थेच्या माध्यमातून जमिनीतील पाण्याची भूजल क्षमता वाढविण्यासाठी अंभेरपाडा येथे वनराई बंधारा बांधण्यात आला. युनायटेड वेच्या अनेक ग्रामस्थांकडून श्रमदान करण्यात आले.

युनायटेड वे मुंबई संस्थेचे जल संजीवनी प्रकल्प, कर्जत अंतर्गत अंभेरपाडा, पाथरज, खांडस, नांदगाव आणि वारे ग्रामपंचायतीमधील ४२ गावांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. मुख्यतः पाणीटंचाईला सामोरे जाण्यासाठी जल आणि मृदा संधारण संबंधित विविध उपक्रमावर प्रकर्षाने भर देण्यात येत आहे. सामाजिक बांधिलकी (सीएसआर) अंतर्गत युनायटेड वे मुंबई आणि अंभेरपाडा येथील जल संजीवनी प्रकल्पातील महिला बचत गट तसेच गावातील तरुण यांनी श्रमदान करून वनराई बंधारा बांधला. पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून जमिनीत मुरवणे आहे.

जमिनीतील पाण्याची भूजल पातळी वाढवून त्याचा उपयोग ग्रामस्थांना आणि जनावरांना पिण्यासाठी होईल. वनराई बंधारा बांधण्याच्या कामात आणि श्रमदान करण्यासाठी महिला बचत गटातील २३ सदस्य आणि तरुण वर्ग तसेच जल संजीवनी प्रकल्पातील चार टीम मेंबर्स असे एकूण ४६ जणांनी एकत्र येऊन श्रमदान केले. वनराई बंधारा बांधण्याच्या कामाच्या वेळी संस्थेचे प्रकल्प समन्वयक विवेक कोळी आणि अभियंता निवृत्ती गुडेकर यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. संतोष काठे आणि प्रमोद धाडवड यांनी जलसंजीवनी प्रकल्पाकडून पुढाकार घेत होते.



## निवडणुकीच्या आचारसंहितेदरम्यान मुरूड पोलिसांचे संचलन

**मुरूड : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी मुरूड पोलीस ठाण्याच्या वतीने ठाण्याचे निरीक्षक नामदेव बंडगर यांच्या नेतृत्वाखाली शहरात संचलन करण्यात आले.

यामध्ये केंद्रीय रिझर्व फोर्सचे ४० जवान, दंगा काबू पथक वडखळचे ३० पोलीस जवान तसेच मुरूड पोलीस ठाण्याल २० कर्मचाऱ्यांनी राजपुरी कोळीवाडा, राजपुरी मोहल्ला, बाजारपेठ, एकदर, मारुतीनाका, आझाद चौका, डोंगरी, चिखलपाखाडी नाका, नांदगाव आदी भागात संचलन केले.

या वेळी पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर, उपनिरीक्षक अविनाश ढाकरे, दिपक राऊळ, केंद्रे, रवी गर्जे, किशोर बठारे, मकरंद पाटील व पोलीस कर्मचारी संचलनात सहभागी झाले होते.




### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकाकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. ज्याचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – उसर्ली बुद्रुक, ता पनवेल व जिल्हा रायगड**

| गट क्रमांक/ सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | भोगवटादार | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १९ | २ | श्रीमती. नेत्रप्रभा गुलाब भोपी | ०-०९-०० | १.७४ |
| | | श्री. दिलीपकुमार फतेहलाल खेरोदिया | ०-२१-०० | ४.०७ |
| | | एकूण | ०-३०-०० | ५.८१ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २१/१०/२०२४**

**सही /-**
**अ‍ॅड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
**२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड,**
**म्हातवली, उरण, रायगड, पिन कोड- ४००७०२**
**मोबाईल नं. ७६६६०१०२९३**


## ममदापूर गावातील कार्यकर्ते शिवसेनेत

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील ममदापूर गावातील शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस व शेकापमधील कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. आमदार महेंद्र थोरवे यांनी या सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत केले.

या वेळी जिल्हा सल्लागार गजेंद्र वाघेश्वर, युवा सेना प्रसाद थोरवे, उपतालुका प्रमुख अंकुश शेळके, उपतालुका संघटक सुभाष मिनमिने, नेरळ शहर प्रमुख प्रभाकर देशमुख, शहर संपर्क प्रमुख किसन शिंदे तसेच पंढरीनाथ चंचे, सचिन खडे आदी प्रमुख उपस्थित होते.

युवक कार्यकर्ते रोशन शिंगे यांच्या माध्यमातून ममदापूर गावातील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे पक्षाचे कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. मल्हारी शिंगे (राष्ट्रवादी गाव अध्यक्ष ममदापूर), कोंडू शिंगे (राष्ट्रवादी), नागेश शिंगे (उबाठा) भालचंद्र शिंगे (शेकाप), दिनेश शिंगे (उबाठा), ज्ञानेश्वर शिंदे (शेकाप), राजेश सोनवळे (उबाठा, उपशाखा प्रमुख), सरिता शिंगे (राष्ट्रवादी), शरदा शिंगे (राष्ट्रवादी), कल्पना शिंगे (राष्ट्रवादी), ज्योत्स्ना शिंगे (उबाठा), भालचंद्र शिंगे (उबाठा), प्रियंका शगे (शेकाप), तेजस शगे (राष्ट्रवादी), दर्शन शिंगे (उबाठा), जितेश शिंगे (राष्ट्रवादी), दिपेश शिंगे (शेकाप), श्रद्धा शिंदे (उबाठा), विकास शिंगे (शेकाप), राज शिंगे (उबाठा), सागर डिगे (उबाठा), हरी कदम (उबाठा), रघुनाथ बोरसे (उबाठा), हरेश दाभेकर (उबाठा), विजय काळे (उबाठा), रणदीप सिंग (उबाठा), किरण गौडा (शेकाप) कोमल किरण गौडा (शेकाप), स्वप्निल बाळू शिंगे (शेकाप), सागर संजय शिनारे (उबाठा) यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या सर्वांचे स्वागत करण्यात आले.




सिडको
शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **करारनामा/ वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि. क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. पनवेल, जि. पनवेल** | | | | | | | | |
| १ | उलवे २७७ | गव्हाण २१६ | १४१/२<br>१३८/५ | ०-२४-०<br>०-०५-८ | २५० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. A-४१, सेक्टर-१३, क्षेत्र-२५० चौ.मी. | **कै. चंदर अंबाजी पाटील (मयत)<br>कै. गणपत चंदर पाटील (मयत)<br>कै. कृष्णा गणपत पाटील (मयत)<br>कै. संजय गणपत पाटील (मयत)<br>कै.राधाबाई बाबू पाटील (मयत)<br>कै. कानूबाई धाऊ पाटील (मयत) यांचे वारस**<br>१) श्री. जनार्दन चंदर पाटील<br>२) श्री. राजीव बाबू पाटील<br>३) श्री. बाळाराम धाऊ पाटील<br>४) श्रीमती नंदा धाऊ पाटील उर्फ नंदा रामदास म्हात्रे<br>५) श्रीमती निर्मला गणपत पाटील<br>६) श्रीमती सावित्री गणपत पाटील उर्फ सावित्री उर्फ प्रणिता प्रशांत घरत<br>७) श्रीमती संजीली कृष्णा पाटील<br>८) कु. श्रीयश कृष्णा पाटील व<br>९) श्रीमती नम्रता गणपत पाटील उर्फ नम्रता भरत गायकवाड | - - |
| २ | नावडे ११६+११६ | नावडे ४क/७३ | १०६/१ | ०-१५-७ | १५० चौ.मी. | भूखंड क्र. ११८, सेक्टर नावडे फेज-२ क्षेत्र-१५० चौ.मी. | भोजराज हरिभाऊ पाटील | निरंक |
| | | | एकूण क्षेत्र | ०-१५-७ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार असून अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
**सिडको/जनसंपर्क/३१०/२०२४-२५**



### मूळ कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. संतोष धनाजी जाधव यांनी खालील वर्णन केलेली सदनिका श्री. अशोक शिवाजी वायदंडे यांचेकडून विकत घेतलेली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**पनवेल महानगर पालिका अधिकारक्षेत्र, ता. पनवेल, जि. रायगड**

KL-४, बिल्डींग नं.१०७, रूम नं.३, श्री. गणेश कृपा अपार्टमेंट ओवनर्स असोसीएशन, सेक्टर नं.४ई, कळंबोळी, नवी मुंबई, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड ४१०२१८.

यापुढे सोयीकरिता ''सदरहू मिळकत'' असा उल्लेख

आमचे अशिल श्री. संतोष धनाजी जाधव हे वरील मालमत्तेचे कायदेशीर मालक आहेत व तसेच सदरील मालमत्ता आमचे अशिलांच्या ताबे-कब्जात आहे. सदरील व्यवहार करताना दिनांक ०५/०५/२०२३ रोजी आमचे अशिल यांचकडून कळंबोळी येथे रिक्षाने प्रवास करताना खालीलप्रमाणे मूळ कागदपत्रे गहाळ झालेली आहेत. तसेच सदरील मूळ कागदपत्रे सापडल्यास खालीप्रमाणे संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| १ | दिनांक २७/०२/१९८४ रोजी सिडकोने श्री. दिलीप एन्. काटकर यांना दिलेले पत्राची मूळ प्रत. |
| २ | दिनांक १५/०२/१९८५ रोजी सिडकोने श्री. दिलीप एन्. काटकर यांना दिलेले अलॉटमेंट लेटरची मूळ प्रत. |
| ३ | दिनांक १०/०५/१९८५ रोजी श्री. दिलीप एन्. काटकर यांना सिडकोने दिलेली ताबा पावतीची मूळ प्रत. |
| ४ | दिनांक २२/०५/१९८५ रोजी सिडको आणि श्री. दिलीप एन्. काटकर यांचेमध्ये झालेल्या योग्य मुद्रांक दिलेला हायर परचेस कराराची मूळ प्रत. |
| ५ | दिनांक २६/०६/२०२१ रोजीचा सिडको, श्री. दिलीप नारायण काटकर आणि भारती एम दास यांचेमध्ये योग्य मुद्रांक दिलेला त्रिपक्षीय कराराची मूळ प्रत. |
| ६ | दिनांक १०/०३/२००३ रोजी सौ. भारती माधवनंद दास आणि अशोक शिवाजी वायदंडे यांचेमध्ये झालेला कन्हेयन्स डीड ची मूळ प्रत. सदरील दस्त हा पनवेल येथील दुयम निबंधक उरण (पनवेल-२) यांच्या कार्यालयात दिनांक १०/०३/२०२३ रोजी पावती क. १९३७, दस्त क. उरण-१९३८-२००३ म्हणून नोंद झालेला आहे. |

तरी सदरील मूळ कागदपत्रांबाबत कोणत्याही व्यक्तीस अथवा व्यक्तींना, संघटना, कंपनी, संस्था, कोणतेही सरकारी / संबंधित अधिका-याचे कोणतेही हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास त्या अनुशंगाने लेखी हरकत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत खालील वर्णन केलेल्या पत्त्यावर वेळेस संपर्क साधावा. त्यानंतर कोणत्याही प्रकारची हरकती/तकारी विचार करण्यात येणार नाहीत, याची कृपया नोद घ्यावी. तसेच त्याबाबत आमचे अशिल यांना ना-हरकत दाखला देण्यात येईल.

**दिनांक : २०/१०/२०२४**
**पनवेल.**

**सही /-**
**अ‍ॅड. भरत जगन्नाथ देशमुख**
पत्ता- लिगल अफेर्स ऑफीस, शॉप नं. ५ व ६,
आँरा लूक्सिका, भूखंड दिनांक २७/०२/१९८४
रोजी सिडकोने श्री. दिलीप एन्. काटकर यांना दिलेले
अलॉटमेंट लेटरची मूळ प्रत.क्र. ६, सेक्टर नं.१७, मोठा
खांदा, नवीन पनवेल, ता. पनवेल, जिल्हा-रायगड,
पिन-४१०२०६. मोबाईल-९८६७५११६८३



### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत १) श्री.बाळू बामा पाटील २) श्री. सत्यवान बामा पाटील ३) श्री. पिंट्या बामा पाटील, सर्व रा. केवाळे ता. पनवेल जि. रायगड यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे, केवाळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३३ | १३/अ | ०-२६-५०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण ०-२८-०० | ०.८३ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २१/१०/२०२४**

**सही /-**
**अ‍ॅड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
**२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड,**
**म्हातवली, उरण, रायगड, पिन कोड- ४००७०२**
**मोबाईल नं. ७६६६०१०२९३**



### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत १) श्रीमती. सीताबाई तुकाराम पालकर २) श्री. सदानंद तुकाराम पालकर ३) श्री. अमोल तुकाराम पालकर ४) श्री. अमर तुकाराम पालकर सर्व रा. केवाळे ता. पनवेल जि. रायगड यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे, केवाळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३० | १ | ०-२४-२०<br>पो.ख. ०-०२-५०<br>एकूण ०-२६-७० | १.४४ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकत रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २१/१०/२०२४**

**सही /-**
**अ‍ॅड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
**२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड,**
**म्हातवली, उरण, रायगड, पिन कोड- ४००७०२**
**मोबाईल नं. ७६६६०१०२९३**

# बेकायदा पार्किंगमुळे अपघात

## टेम्पोला कार धडकून एक जण ठार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**




जलद गती मार्गावर वाहन पार्क करणे नियमबाह्य असतानाही शीव पनवेल मार्गावर अनेक ठिकाणी जड अवजड वाहने पार्क केली जातात. अशाच एका बेकायदा पार्क केलेल्या टेम्पोचा अंदाज न आल्याने टेम्पोला एक कार धडकली. या अपघातात मुंबईत कस्टममध्ये अधीक्षक पदावर कार्यरत अधिकाऱ्याचा दुर्दवी मृत्यू झाला असून अन्य दोघे जखमी झाले आहे. या प्रकरणी टेम्पोचालकाला ताब्यात घेतले आहे.

घनशाम वर्मा असे आरोपीचे नाव आहे. रविवारी सकाळी शीव पनवेल मार्गावर पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर जुईनगर रेल्वे पादचारी पुलाखाली रस्त्याच्या दुसऱ्या मार्गिकेवर वर्मा याने त्याचा टेम्पो (एमएच ४६ बीव्ही ९२५१) पार्क केला होता. विशेष म्हणजे त्याने पार्किंग लाईट लावलेले नव्हते. सकाळी साडे अकरा बाराच्या सुमारास वाशी कडून सीबीडीच्या दिशेने याच मार्गावरून एका कार मधून कस्टम अधीक्षक नरेंद्र राय आणि त्यांचे सहकारी गौरव सिन्हा, अभिनव रामकुमार सिन्हा, आणि दीपक गुप्ता हे जात होते. जलद मार्ग असल्याने गाड्यांचा वेग बऱ्यापैकी जास्त होता. त्यात जुईनगर येथे उभा असलेल्या टेम्पोचा अंदाज टेम्पोचा पार्किंग लाईट सुरू नसल्याने गाडी चालवणारे अभिनव यांना आला नाही. त्यामुळे या टेम्पोला गाडी मागून धडकली. त्यात हे चौघेही जखमी झाले, मात्र नरेंद्र यांच्या डोळ्याला आणि डोक्याला जबर मार लागला. चौघांनाही अपोलो रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र तेथे नरेंद्र यांचा मृत्यू झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले तसेच अन्य जखमींवर उपचार सुरू आहेत.

अपघात घडल्यावर कार अचानक धडकल्याने मागून येणाऱ्या दुचाकी स्वाराचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि त्याची दुचाकी कारला धडकली. त्यात दुचाकीचे नुकसान झाले तर दुचाकी स्वार किरकोळ जखमी झाला. या प्रकरणी नेरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हलगर्जी आणि बेकायदा गाडी पार्क केल्याने झालेल्या अपघातात एकाच्या मृत्यूस कारण ठरला म्हणून टेम्पो चालक घनश्याम याला ताब्यात घेतले असून त्याच्यावर अटकेची कारवाई केली जाणार आहे., अशी माहिती तपासाधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक तुकाराम कोरडे यांनी दिली.

दरम्यान, सद्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खासगी गाड्या दिसतात. यामुळे वाहनांची वर्दळ जास्त असते. अशातच वाहतुकीच्या नियमांचा भंग होतो व अपघात घडतात.

# पनवेलमधील बेपत्ता मुलीचा गाढी नदीत सापडला मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल मधील पेठगावात राहणारी आणि दुपारी आपल्या घरातून बेपत्ता झालेली काजल पासवान (वय १७) या मुलीचा मृतदेह गाढी नदीत सापडला. आजारपणामुळे नैराश्येत आलेल्या या मुलीने गाढी नदीच्या पात्रात उडी टाकून आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे. पनवेल शहर पोलिसांनी या प्रकणात अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील कार्यवाहीला सुरुवात केली आहे.

मृत काजल पासवान पनवेलच्या पेठगांव येथे कुटुंबासह राहण्यास होती. काजल दहावीत दोन वेळा नापास झाल्याने २०२२पासून घरामध्येच होती. त्यानंतर ती नैराश्येत आल्याने तिच्यात चिडचिडेपणा वाढला होता. दरम्यानच्या काळात काजलच्या डोक्यात आणि पोटामध्ये गाठ असल्याचे तपासणीत आढळून आले होते. त्यामुळे तिला दोन वेळा रुग्णालयात उपचारासाठी दाखलदेखील करण्यात आले होते. या सर्व प्रकारामुळे काजल नैराश्येत आली होती. त्यामुळे आई घरामध्ये झोपली असताना, काजल घरातून निघून गेली होती. त्यानंतर तिने गाढी नदीच्या पात्रात उडी टाकून आत्महत्या केली होती.

काजल अचानक बेपत्ता झाल्याने तिच्या आई-वडीलांनी तिची शोधा-शोध केली, मात्र ती कुठेच सापडली नाही. त्यामुळे त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करुन तिचा शोध सुरू केला होता. त्यावेळी गाढी नदीच्या किनारी काजलची चप्पलदेखील आढळून आली होती. त्यामुळे पोलिसांनी आग्नशमन दलाच्या मदतीने नदीपात्रात शोध देखील घेतला होता, मात्र त्यांच्या हाती काहीच लागले नव्हते.

अखेर काजलचा मृतदेह नादंगाव येथील नवीन ब्रीजच्या खाली गाढी नदीत आढळून आल्यानंतर पोलिसांनी धाव घेऊन तिचा मृतदेह ताब्यात घेतला.

# भातपिकांची कापणीसह मळणी



**उरण : प्रतिनिधी**

परतीच्या पावसाने उरण तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता लगबगीने शेतातच भात पिकांची कापणी करून मळणीला सुरुवात केली आहे.

नवरात्रीत हलकी भात पीके तयार होतात, मात्र या काळात झालेल्या परतीच्या पावसामुळे पीके शेतात कोसळून कणसे कुजू लागली आहेत. तर अशाच प्रकारे पिके पाण्याखाली राहिल्यास त्यांना पुन्हा मोड येण्याची भीती आहे.

त्यामुळे पिकांचे अधिक नुकसान होऊ नये यासाठी शेतकऱ्यांनी भात पिकांच्या कापणी आणि मळणीला सुरुवात केली आहे. अनेक ठिकाणी पत्र्याचे पिंप वापरून त्याच्यावर झोडणी सुरू आहे. तर मळणी करण्यात आलेली पिके ही ओळी असल्याने ती उन्हात सुकण्यासाठी ठेण्यात आली आहेत. उरणच्या वाढत्या औद्योगिकीकरणामुळे येथील पिकत्या जमिनीत घट होऊ लागली आहे. त्याचप्रमाणे हजारो एकर जमीन समुद्राच्या पाण्यामुळे नापिकीही झाली आहे.

त्यामुळे अगदी कमी प्रमाणात शेती उरली आहे. मात्र या शेतीत ही येथील शेतकरी मेहनतीने कष्ट करून शेती व्यवसाय करीत आहे. येथील एक पिकी व पावसावर अवलंबून असलेल्या शेतीतून शेतकऱ्यांना नफा मिळत नाही, मात्र शेतीवरील प्रेमापोटी शेतकरी आणि त्यांचे कुटुंबीय काम करून शेती करीत आहेत. यात अनेक जमीनी या नव्याने मशागत करून पिकविण्यात येत आहेत.

# प्रा. डॉ. संदीप घोडके यांच्या संदर्भ ग्रंथाचे प्रकाशन

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील वाजेकर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख व मुंबई विद्यापीठातील संशोधक मार्गदर्शक डॉ. संदीप विलासराव घोडके यांनी दीर्घकाळ मेहनत घेऊन लिहिलेल्या व प्राची प्रकाशन यांनी प्रकाशित केलेल्या या संदर्भ ग्रंथाचे दिमाखदार, उत्साही पद्धतीने प्रकाशन करण्यात आले.

डॉ. घोडके यांनी लिहिलेल्या GOOD GOVERNANCE (सुशासन) Leader, People and the Process : या संदर्भ ग्रंथाचे प्रकाशन मुंबई विद्यापीठ मानव्य शास्त्र अधिष्ठाचा प्राचार्य डॉ. अनिल सिंग व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. भगवान लोखंडे आणि डॉ. वाल्मीक गरजे तसेच विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, रायगड, नवी मुंबई, मुंबई क्षेत्रातील महाविद्यालयांचे प्राध्यापक, नवीन शैक्षणिक धोरणाचे महाविद्यालय प्रमुख आणि रयत



शिक्षण संस्थेतील विविध शाखांमधील सेवकांच्या उपस्थितीत झाले.

आधुनिक काळात सहभागी लोकशाही व पारदर्शक व्यवहारांची नितांत गरज असताना प्रशासनात आदर्श तत्वांची आवश्यकता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. भारतरत्न माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस राष्ट्रीय सुशासन दिवस साजरा केला जाऊ लागला . त्यानिमित्त चांगले शासन या संकल्पनांची चर्चा होत असताना डॉ. घोडके यांना त्यांचे वडील महाराष्ट्र शासनाचे निवृत्त अधिकारी स्वर्गीय विलासराव घोडके यांच्या कडून चांगले शासन या संदर्भातील प्रेरणा मिळत गेली. यापूर्वी विविध चर्चासत्र, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये या आशयाचे लेखन त्यांनी केले आहे.

या विचार मंथनामधूनच सुशासन संदर्भ ग्रंथ इंग्रजीमध्ये आकारास आला. त्यांच्या या संदर्भ लेखनास त्यांची कन्या श्रुती घोडके (IIT) तिचे व अन्य प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

डॉ. घोडके यांच्या या संदर्भ ग्रंथ व शैक्षणिक उपक्रमा निमित्त रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सुधीर घरत व इतर पदाधिकारी, मुंबई विद्यापीठ अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, सदस्य, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक हितचिंतक, स्नेही व मित्रपरिवार यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे व भविष्यात अशाच पद्धतीने मराठीतूनसुद्धा ग्रंथ लेखनाचे कार्य अविरत सुरूच ठेवावे याकरिता त्यांना मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.



**पनवेल : दिवाळीनिमित्त बाजारपेठा सजल्या आहेत. यामध्ये रांगोळी साहित्य व रंग मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आले आहेत. नागरिक ते खरेदी करण्यासाठी गर्दी करीत आहेत.** (छाया : सुबोध ठाकूर)

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा पर्यावरणीय उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.२१) राष्ट्रीय योजना विभागातर्फे पेपर बॅग मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

शहरांमध्ये प्लॅस्टिकच्या भरमसाठ वापरामुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी होत आहे. त्यामुळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पेपर बॅगेचा वापर करावा व प्लास्टिकचा वापर कमी करावा तसेच त्यांनी समाजामध्ये जाऊन पेपर बॅग वापराविषयी जागरूकता निर्माण करावी यासाठी ही स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेत महाविद्यालयातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तसेच त्यांनी सुमारे २०० पेपर बॅग तयार केल्या.



या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. राहुल कांबळे यांनी काम पाहिले. या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी मार्गदर्शन केले. प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. नीलम मोरे, प्रा. शितल चव्हाण, प्रा. शुभम शर्मा, प्रा. मनोज यादव तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी योगदान दिले.

# रेडिमेड दिवाळी फराळ विक्रीतून महिलांना रोजगार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव मोठ्या दणक्यात साजरे करण्यात आले. आता यंदाची दिवाळीदेखील मोठ्या धुमधडक्यात साजरी होणार आहे. सर्वच महिलांना घरी फराळ करता येतोच असे नाही. विशेषतः नोकरी करणाऱ्या महिला फराळ खरेदीवर जास्त भर देतात. त्यामुळे महिला बचत गट, याशिवाय घरगुती फराळ बनविणाऱ्या महिलांच्या हाताला चांगले काम मिळाले आहे. म्हणून त्यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

वर्षातील सर्वांत मोठा सण म्हणजे दिवाळी, प्रकाशाच्या या सणात चिवडा, चकली, अनारसे आणि शंकरपाळे यासह अन्य पदार्थापासून दिवाळीची सुरुवात होते. अनेक जण घरगुती फराळ तयार करतात, तर बहुतांश नागरिक महिला बचत, स्वीट मार्टमधून फराळाचा गोड पदार्थ खरेदी करतात. पनवेल परिसरात मोठ्या प्रमाणात स्वीट मार्ट आहेत. त्या माध्यमातून जरी फराळाची विक्री होत असली तरी घरगुती दिवाळी फराळाची मागणी कमी न होता वाढलेली आहे. दिवाळी सण जवळ आल्याने गृहिणी फराळ बनविण्याच्या तयारीला लागल्या आहेत. घरगुती चव, कमी तेलाचा वापर करून केलेले पदार्थ आणि स्वच्छतेला मिळालेले प्राधान्य या निकषांवर घरगुती उद्योग करणारे महिला बचत गट तसेच महिलांकडून बनविलेल्या फराळाच्या पदार्थांना सणासुदीला अधिक मागणी असते.

घरगुती फराळ बनविण्यासाठी खास करून तेलात किंवा तुपात बनविले जातात. त्यामुळे त्याचा दरदेखील तसा आकारला जातो. रेडिमेड फराळामुळे नोकरदार महिलांना टेन्शन फ्री रहावे लागते, पण खाद्य वस्तुंसह खाद्य तेलाचे दर वाढले आहेत. त्यामुळे तयार फराळाच्या पदार्थाच्या दरामध्ये ५ ते १० टक्के वाढ करण्यात आली आहे. अवघ्या काही दिवसांवर दिवाळीचा सण येऊन ठेपला आला आहे. त्यामुळे फराळ त्याचबरोबर गोड पदार्थांची मागणी वाढलेली आहे.

फराळाचे सामान, वाहतूक खर्च वाढल्याने दिवाळी फराळाच्या किंमतीत वाढ झाली असल्याचे विक्रेते सांगतात. ग्राहकांना करंजी, अनारसे नगावर न देता किलो प्रमाणे विकले जात आहे, जेणेकरून ग्राहकांनादेखील फराळ परवडला पाहिजे. यासाठी किंमतीत वाढ करण्यात आली असल्याचे बचत गटाच्या प्रतिनिधींनी सांगितले.

## ऑर्केस्ट्रा बारमध्ये अश्लील नृत्य

**नवी मुंबई : बातमीदार**

खैरणे एमआयडीसीतील सफायर (बेला) आर्केस्ट्रा बारवर पोलिसांना छापा टाकून कारवाई करून अश्लील नृत्य करणाऱ्या १६ महिला, दोन वेटर, दोन ग्राहक आणि व्यवस्थापक अशा २१ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

ऑर्केस्ट्राच्या नावाखाली या बारमध्ये महिला गायिका अश्लील नृत्य करीत असल्याची तक्रार तुर्भे एमआययडीसी पोलिसांना मिळाली होती. त्याआधारे पोलिसांनी शुक्रवारी मध्यरात्री या बारवर धाड टाकली. या वेळी काही महिला तोटके कपडे घालून अश्लील नृत्य करीत होते. तर काही ग्राहक त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत होत्या. वेशातील पोलिसांनी नृत्यंगणा, ग्राहक, वेटर आणि व्यवस्थापकाला ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३ (५) आणि २९६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# नवी मुंबईतील ५१ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या नवी मुंबई महापालिका संचलित माध्यमिक विद्यालय दिवाळे कोळीवाडा, शाळा क्रमांक ११७ या शाळेच्या विद्यार्थ्यांचा दिवाळे ग्रामस्थ मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या वेळी उत्तीर्ण झालेल्या ५१ विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र व भेटवस्तू देऊन गुणगौरव करण्यात आला. समारंभाच्या वेळी विद्यार्थी व पालकांसोबत वरिष्ठ शिक्षकांनी विविध विषयावर संवाद साधला तसेच सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशाबद्दल विद्यार्थ्यांसह शाळेतील शिक्षकांचेदेखील पालकांनी अभिनंदन करून आभार व्यक्त केले.

प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या यशामागे त्याने केलेल्या खडतर परिश्रमाचा इतिहास असतो. यशस्वी व्यक्तींच्या परिश्रमाची दखल घेऊन त्यांच्या यशाचे गुणगौरव आणि कौतुक केल्याने इतरांना यश संपन्नाचे शिखर गाठण्यासाठी संघर्ष करण्याची प्रेरणा मिळते तसेच, प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये काहीतरी वेगळेपण असते. ज्या दिवशी तुम्हाला हे वेगळेपण सापडेल, त्या दिवशी तुम्हाला तुमच्या वाटा सापडतील आणि जगणे सुंदर होईल.

मुलांनी मोठे होऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे, नाव कमवावे इतकीच अपेक्षा आई-वडिलांची असते व ती पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून झटले पाहिजे, या शब्दांत मुख्याध्यापिका शोभा कुदळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी शालेय गुणगौरव सोहळ्यावेळी गावचे पाटील परशुराम पाटील, मुख्याध्यापिका शोभा कुदळे हरिचंद्र कोळी, महादेव कोळी, कुमार कोळी, एकनाथ कोळी, अशोक गझने, प्रेमेश बोस, ज्ञानेश्वर घरत, नारायण मार्के, मोरेश्वर मार्के, शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षिका सुवर्णा चव्हाण, नयना म्हात्रे, शोभा पाटील, किसन गजणे, जगदीश पाटील, शिवदास कोळी, निकेश काबोटकर यांच्यासह पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसोबतच त्यांना घडविणाऱ्या गुरुजनांचाही सन्मान करण्यात आला. उद्याच्या भविष्य असणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करता आला याचा आनंद आहे, असे मत दिवाळे ग्रामस्थ मंडळाने व्यक्त केले व अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी विध्यार्थांना शुभेच्छा दिल्या.

# चौक परिसरातील ३० गावे रात्रभर अंधारात

## परतीच्या पावसामुळे मेन लाईनचे दोन पोल जमीनदोस्त

**खालापूर : प्रतिनिधी**

परतीच्या पावसाने खालापूरसह खोपोली, रसायनी, चौक व वावोशी पट्ट्यात धुमाकूळ घातला आहे. रविवारी (दि.२०) संध्याकाळी ५ वा. सुमारास वारा व विजेच्या कडकडाटासह पावसाने सुरुवात केली. यामुळे मागील २० तास चौक गाव परिसरातील ३० गावांतील वीज गायब झाली.

पातळगंगामधून येणाऱ्या लाईनचे दोन पोल पडले असून पनवेल तालुक्यातील भोकरपाडा येथून येणाऱ्या हायटेन्शन केबलमध्ये बिघाड झाल्याने विद्युतपुरवठा खंडित झाला. परिणामी रविवारी रात्री व सोमवारी दुपारी ३ वा. पर्यंत चौकसह ३० गावांचा विद्युतपुरवठा खंडित झाला होता. पाणीपुरवठा करणाऱ्या पंपांना वीजपुरवठा न झाल्याने रहिवाशांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल झाले.

याबाबत विद्युत वितरण कंपनीचे चौक क्षेत्राचे अभियंता बोरकर यांनी सांगितले की, रविवारी संध्याकाळी विजांच्या कडकडाटासह वादळी वारा झाल्याने भोकरपाडाहून विद्युत सप्लाय करणाऱ्या वायरचे रसायनी येथे दोन पोल पडल्याने विद्युतपुरवठा खंडित झाला. विद्युतपुरवठा पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. सोमवारी दुपारपर्यंत विद्युतपुरवठा सुरळीत होईल, असे सांगितले.

सामाजिक कार्यकर्ते फिरोज शेख यांनी सांगितले की, विद्युतपुरवठा खंडित झाल्यामुळे रात्रभर चौक गाव व आसपासच्या ३० गावांतील रहिवाशांनी रात्र जागून काढली असून पाणीपुरवठा होत नसल्याने पाण्यावाचून मोठे हाल झाले. फिरोज शेख, रितेश पवार, ओमकार सोनटक्के, अजय म्हामुणकर, आकाश बाबरे, बाळू कराडकर ऋतुराज कदम, प्रसन्न मापाडी, रोहित धनगावकर यांनी आदीवासी पाड्यांवर पाण्याच्या बाटल्या वाटप केल्या.

दरम्यान सोमवारी दुपारी २ वा. भोकरपाडा येथील काम पूर्ण झाले व रसायनी येथील पोल उभे करण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आले.



## निवडक

### धर्मरक्षक हिंदू सेनेतर्फे पोलिसांना निवेदन



**रोहे** : दिवाळीमध्ये देवीदेवतांचे फटाक्यांच्या माध्यमातून होणाऱ्या विटंबना थांबवण्याबाबत धर्मरक्षक हिंदू सेनेच्या वतीने रोहा पोलीस निरीक्षक देविदास मुपडे यांना निवेदन दिले आहे. या वेळी अध्यक्ष तुषार मोरे, चंद्रकांत पार्टे, राजेश कोल्हटकर, जयेश छेडा, तेजस देशमुख, देवेंद्र जुईकर, आशिष स्वामी, किरण मोहिते, सोलंकी आदी उपस्थित होते. निवेदनात, दिवाळी हा सण सनातन धर्मामध्ये मोठा सण मानला जातो आणि यात महालक्ष्मी देवीची विशेष पूजन केले जाते, परंतु त्या सणांमध्ये आमच्या देवीदेवतांचे प्रतिमा असलेले फटाके मोठ्या प्रमाणात फोडले जातात व त्यातून सनातन धर्माच्या भावना दुखावल्या जातात. ही कृती वर्षानुवर्षे होत असून त्यास आपल्या माध्यमातून पूर्णविराम लागावा यासाठी फटाके व्यावसायिकांना आवश्यक सूचना देण्यात याव्या, अशी मागणी करण्यात आली आहे.

### मांडवा सागरी पोलिसांचे संचलन



**अलिबाग** : आगामी सार्वत्रिक विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने मांडवा सागरी पोलिसांनी उपविभागीय पोलीस अधिकारी विनीत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.१९) सायंकाळी चोंढी व झिराड येथे संचलन केले. हे संचलन चोंढी येथील स. म. वडके शाळा, चोंढी नाका, अपना बाजार, रेल्वेफाटक, मुख्य बाजारपेठ, चोंढी पूल असे काढण्यात आले, तसेच झिराड येथील स्टेट बँक ऑफ इंडिया, वैभव हॉटेल, मुख्य बाजारपेठ, पाटील पोल्ट्री, मांडवा सागरी पोलीस ठाणे असे पदपथ संचलन करण्यात आले. या वेळी मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक भोई, दुय्यम अधिकारी पोलीस उपनिरीक्षक खोत, पोलीस उपनिरीक्षक वाणी व १० अंमलदार, आरसीपी प्लाटून वडखळचे ३२ अंमलदार, सीआयएसएफचे ४६ जवान या संचलनात सहभागी झाले होते.

### रोह्यात स्मृतीस्तंभाला अभिवादन

**रोहे** : पोलीस स्मृती दिनानिमित्त रोहा पोलीस ठाणे येथे सोमवारी (दि.२१) स्मृतिस्तंभाला अभिवादन करण्यात आले. शहीद पोलिसांना श्रद्धांजली वाहण्यात आली. निरीक्षक देविदास मुपडे यांनी स्मृतिस्तंभाला पुष्पहार अर्पण केले. या वेळी उपनिरीक्षक सलमान खतीब, अधिकारी जयेंद्र पेडवी, निलीशा पेडवी, शरद कोटकर, सुरेश भोईर व पोलीस अधिकारी, कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते जयेश छेडा, चंद्रकांत पार्टे, आशिष स्वामी, तुषार मोरे, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, हजर होते.



# भाड्याच्या रूममधून पाच लाखांची चोरी

## महिला पोलीस कर्मचाऱ्याची तक्रार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाण्यात कार्यरत असणाऱ्या महिला कर्मचारीच्या भाड्याच्या रूममधून पाच लाखांची चोरी झाल्याची तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे नोंदविण्यात आली आहे.

रेवदंडा पोलीस ठाणे येथे पेण-बार्वे येथील आरती एकनाथ पाटील या कार्यरत होत्या. त्यांनी रेवदंडा भोईवाडा येथील इमारन पावगी यांचे चाळीमध्ये भाड्याने रूम घेतली होती. त्यांच्या रूमच्या शेजारी मुमताज पिंजारी व मेहराज पिंजारी हे राहात होते. ते दोघेही नेहमी त्यांच्या रूममध्ये येत-जात होते. यामधील मेहराज पिंजारी हे नेहमी त्यांच्या सामानाला हात लावत असत. त्या वेळी त्यांनी त्यास सामानाला हात लावू नकोस, असे सांगितले. दरम्यान आरती पाटील यांना रेवदंडा पोलीस ठाणे येथून कार्यमुक्त केल्याने त्या गावी निघून गेल्या होत्या. रूममधून सामान नेण्यासाठी त्या काही दिवसांनी आल्या असताना रूममध्ये ठेवलेली पाच लाखांची रक्कम पेटीत नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. ही रक्कम शेजारील मुमताज पिंजारी व मेहराज पिंजारी यांनी चोरी केली असल्याचा संशय आल्याने त्यांना खात्री असल्याने त्यांनी रेवदंडा पोलीस ठाणे येथे त्यांचेविरोधात तक्रार नोंदविली. अधिक तपास उपनिरिक्षक शिवकुमार नंदगावे हे करीत आहेत.

# आमदार दळवी यांचा मुरूडमध्ये सत्कार

**मुरूड : प्रतिनिधी**

ज्या वेळी सत्तेत बद्दल होऊन मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे विराजमान झाले त्याच वेळी विकासाचे पर्व सुरू झाले. माझ्या मतदारसंघात मुख्यमंत्री शिंदे यांच्यामुळे विकासकामांना निधी प्राप्त झाला, असे प्रतिपादन आमदार महेंद्र दळवी यांनी केले आहे.

आमदार दळवी यांचा नागरी सत्कार माळी समाज हॉल येथे सर्व समाजातर्फे करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते. आमदार दळवी यांनी १० कोटी रुपयांचा निधी शहरातील विविध समाजासाठी दिल्याबद्दल समाजातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर, स्नेहा पाटील, मुरूड शहरप्रमुख संदीप पाटील, संजय गुंजाळ, जिल्हा संघटिका तृप्ती पाटील, जिल्हा संघटक दिनेश मिनमिणे, तालुकाप्रमुख ऋषीकांत डोंगरीकर, गिरीश साळी, पांडुरंग आरेकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात सर्व समाज अध्यक्षांनी आमदार दळवी यांना त्यांच्या पाठिंबा जाहीर केला.





**माणगाव** : कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी निवड झाल्याबद्दल भाजपचे महेश सुर्वे यांचे राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील, भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, उद्योजक विजय मेथा, ज्योती मेथा, मनीष मेथा यांनी अभिनंदन केले.

# वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रविवारी (दि.२०) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण ५५० चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून पाच लाख एक हजार ५५० रुपये इतका दंड आकारला आहे.

# उद्योजक निर्मितीत विश्वकर्मांचा पुढाकार महत्त्वाचा -डॉ. मेधा सोमय्या

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आत्मनिर्भर रोजगारक्षम उद्योजक निर्मितीत विश्वकर्मांचा पुढाकार महत्त्वाचा आहे, असे मत डॉ. मेधा सोमय्या यांनी व्यक्त केले.

भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जनशिक्षण संस्थान पर्यावरणपूरक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सहाण येथे संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा सोमैया यांच्या माध्यमातून राबवित असून प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या यशस्वी लाभार्थ्यांना प्रशस्तीपत्रक वाटून त्यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी त्या बोलत होत्या.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी पुढाकार घेण्यात आला आहे. या योजनेतून व्होकल फॉर लोकलसाठी जेएसएस रायगडचे सक्रीय योगदान आहे, असे मत संचालक डॉ. विजय कोकणे यांनी व्यक्त केले.

या सहा दिवसांच्या प्रशिक्षण वर्गांमध्ये प्रति विद्यार्थी एकत्रित प्रोत्साहन भत्ता चार हजार रुपयांबरोबरच, मोफत प्रशिक्षण प्रमाणपत्र, प्रत्येकी १५ हजार रुपयांचे विश्वकर्मा किट अथवा व्हाउचर्स बरोबरच कौशल्य वृद्धी प्रशिक्षणासह पाच टक्के व्याजदराने तीन लाखांपर्यंतची टप्प्याटप्प्याने कर्ज सुविधादेखील प्रशिक्षाणार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. या वेळी मुंबई मुलुंड येथील विठ्ठल रखुमाई महिला मंडळ ज्येष्ठ नागरिक प्रतिनिधींनीदेखील शैक्षणिक सहलीदरम्यान जनशिक्षण संस्थान पर्यावरणपूरक व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सहाण अलिबाग केंद्रास भेट देऊन संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमासाठी अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, मुलुंड येथील विठ्ठल रखुमाई महिला मंडळ ज्येष्ठ नागरिक प्रतिनिधी, अकाउंट ऑफिसर प्रतिक्षा चव्हाण, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी राजश्री नाईक, प्रशिक्षक अस्मिता भोईर, रिद्धी पाटील, प्रांजल पाटील, हिमांशू भालकर, अजय पाटील, नवनाथ पोईलकर, भारती पोईलकर आदी उपस्थित होते.



# पेणमध्ये विजेचा सावळागोंधळ

## वारंवार होतेय बत्ती गूल; नागरिक हैराण

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यात मागच्या काही दिवसांपासून विजेचा सावळा गोंधळ सुरू झाला आहे. रात्री अपरात्री वीज गायब होत असल्याने येथील नागरिक हैराण झाले आहेत.

दोन-तीन दिवसांपासून वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे, मात्र पावसाने सुरुवात करताच तत्काळ वीज गायब होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. तालुक्यातील अंतोरे, हमरापूर, दादर, जिते, खारपाडा यांसह पेण शहरात सारखी वीज गायब होत असल्याने अनेक व्यापारी, इलेक्ट्रिक दुकानदारांना याचा फटका बसत आहे. एकीकडे महावितरण कंपनीने वीजबीलात भरमसाठ वाढ केल्यामुळे ग्राहकांना वीजबील भरताना दमछाक होत आहे.

बील भरताना उशीर झाला तर महावितरण तातडीने त्या ग्राहकाची वीज खंडित करतात. मग वीजपुरवठा कायम सुरळीत का राहत नाहीत? असा सवाल नागरिक करीत आहेत.

## बेपत्ता तरुणाचा मृतदेह खाडीत सापडला

**पेण** : दादर पोलीस ठाणे हद्दीतील जिते येथे राहाणाऱ्या २७ वर्षीय युवकाचा मृतदेह रावे खाडीत सापडला आहे. सुरज मधुकर ठाकूर असे मृत युवकाचे नाव असून तो जिते येथील ठाकूर आळीत राहात होता.



सुरज ठाकूर हा मंगळवारी (दि.१५) बेपत्ता झाला होता. याबाबत दादर पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली असताना चौथ्या दिवशी शुक्रवारी (दि.१८)सुरजचा मृतदेह रावे खाडीच्या पाण्यात मिळून आला. पाण्यात पडून बुडून मृत्यू झाल्याने दादर सागरी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक नागेश कदम हे करीत आहेत.

# माथेरानमध्ये मलनिस्सारण प्रकल्पासाठी खोदलेले रस्ते पूर्ववत

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी आता कुठे पावसाचा जोर कमी झाला असून दिवाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर मलनिस्सारण प्रकल्प (एसटीपी प्लांट) कामे पूर्ण करण्यासाठी कामाने वेग घेतला आहे. ज्या ज्या ठिकाणी बाजारपेठेत रस्त्यांची खोदाई पूर्ण करण्यात आली त्या भागातील रस्ते बुजवून पूर्ववत करण्यात येत आहेत.

माथेरान शहरात मलनिस्सारण प्रकल्पाचे काम आता जोरात सुरू आहे. येथे चार महिने पावसाळ्यात ही कामे बंद करण्यात आली होती. त्यामुळे दसऱ्यानंतर या कामाना युद्धपातळीवर सुरुवात झाली आहे.

खोदाई केल्यानंतर सर्व मातीचा उपयोग होण्यासाठी सुरक्षित ठिकाणी साठविण्यात येत आहे. लवकरच या रस्त्यावरील क्ले पेव्हरब्लॉक लावण्यात येणार असून हे रस्ते पूर्ववत केले जाणार असल्याचे संबंकधत ठेकेदाराकडून सांगण्यात आले आहे.

या प्रकल्पाच्या माध्यमातून आगामी काळात गावांमध्ये स्वच्छता दिसून येणार असल्याने अनेक ठिकाणी शौचालयाचे वाहून जाणाऱ्या पाण्याची दुर्गंधी यायची. काही हॉटेल धारकांनी स्वतःच्या हॉटेलमध्ये एसटीपी प्लांट केला नसल्याने त्या हॉटेलचे सांडपाणी मुख्य रस्त्यावरील चेंबरमध्ये येऊन कचरा गोळा झाल्यास सर्व घाण परिसरात पसरल्याने दुर्गंधीचे प्रमाण दिसून यायचे.

एसटीपी प्लांटमुळे गावातील दुर्गंधी हद्दपार होणार असून स्वच्छता राखण्यास मदत होईल, असे नागरिक बोलत आहेत.



# मुंबईचा महाराष्ट्र संघावर दणदणीत विजय

## रणजी करंडक स्पर्धेत नोंदवले हंगामातील पहिले यश

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईने महाराष्ट्राचा नऊ गडी राखून पराभव करीत रणजी करंडक स्पर्धेच्या या हंगामातील पहिला विजय नोंदवला. या सामन्यात पृथ्वी शॉ आणि हार्दिक तामोरे यांनी चौथ्या दिवशी सकाळच्या सत्रात महाराष्ट्राने दिलेल्या ७४ धावांचे लक्ष्य सहज पार केले.




मुंबईचा विजय सामन्याच्या पहिल्याच दिवशी निश्चित झाला होता. पहिल्या सत्रातच मुंबईने महाराष्ट्राला १२६ धावांत गुंडाळले होते. प्रत्युत्तरात १७ वर्षीय सलामीवीर आयुष म्हात्रेने शानदार शतक झळकावून संघाचा पाया रचला. त्यानंतर श्रेयस अय्यरने आणखी एक शतक झळकावून संघाला ३१५ धावांची भक्कम आघाडी मिळवून दिली.

कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या शानदार शतकामुळे महाराष्ट्राने दुसऱ्या डावात कडवे आव्हान उभे केले, पण पाहुणा संघ विजय मिळवू शकला नाही. या सामन्यतील दोन्ही डावात महाराष्ट्राने अनुक्रमे १२६ आणि ३८८धावा केल्या होत्या, तर मुंबईने पहिल्या डावात ४४१ आणि दुसऱ्या डावात ७५ धावा करून सामना जिंकला.

सामन्याचा दुसरा दिवस मुंबईसाठी श्रेयस आणि आयुष म्हात्रे, तर महाराष्ट्रासाठी हितेश वाळुंज आणि कर्णधार ऋतुराज गायकवाड यांनी गाजवला. श्रेयसने प्रथम श्रेणी कारकीर्दीतील १४वे शतक साकारताना १२ चौकार आणि चार षटकारांच्या साहाय्याने १४२ धावांची खेळी केली. १७ वर्षीय सलामीवीर आयुष म्हात्रेनेही (२३२ चेंडूंत १७६) अप्रतिम फलंदाजी केली. त्यामुळे मुंबईने पहिल्या डावात ४४१ धावा केल्या होत्या.

तत्पूर्वी दुसऱ्या दिवशी ३ बाद २२० धावांवरून पुढे खेळताना मुंबईसाठी श्रेयस आणि आयुष यांनी उत्कृष्ट फलंदाजी केली. त्यांनी तिसऱ्या गड्यासाठी २०० धावांची भागीदारी रचली. आयुष द्विशतकी मजल मारणार असे वाटत असतानाच डावखुरा फिरकीपटू हितेश वाळुंजने त्याला माघारी धाडले. आयुषने १७६ धावांची खेळी २२ चौकार आणि चार षटकारांनी सजवली. यानंतर मात्र वाळुंजच्या प्रभावी माऱ्यापुढे मुंबईने ठरावीक अंतराने गडी गमावले.




# न्यूझीलंड संघाने महिला टी-२० वर्ल्डकप जिंकला

**दुबई : प्रतिनिधी**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेवर ३२ धावांनी मात करत प्रथमच जेतेपद पटकावले. त्याचबरोबर क्रिकेट जगताला टी-२० विश्वचषकाचा नवा विजेता मिळाला आहे.

या सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना पाच बाद १५८ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिका संघाला निर्धारित २० षटकात ९ बाद १२६ धावाच करता आल्या. त्यामुळे आफ्रिका संघ पुन्हा एकदा 'चोकर्स' ठरला आहे.

या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय आफ्रिकेसाठी मोठी चूक ठरला. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंडने २० षटकांत पाच बाद १५८ धावा केल्या. अमेलिया केरने न्यूझीलंडसाठी सर्वात मोठी खेळी खेळली.

### दक्षिण आफ्रिकेवर ३२ धावांनी मात

तिने ३८ चेंडूत चीर चौकारांच्या मदतीने ४३ धावा केल्या.

१५९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ न्यूझीलंडच्या गोलंदाजांसमोर सपशेल अपयशी ठरला. सलामीला आलेल्या कर्णधार लॉरा वोल्वार्ड आणि ताजमीन ब्रिट्स यांनी संघाला चांगली सुरुवात करून दिली. दोघींनी पहिल्या विकेटसाठी ५१ धावा (४१ चेंडू) जोडल्या. ही अप्रतिम भागीदारी सातव्या षटकात संपुष्टात आली, जेव्हा ताजमीन ब्रिट्स १८ चेंडूत एक चौकाराच्या मदतीने १७ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. या पहिल्या विकेटनंतर आफ्रिकन संघ सावरू शकला नाही.

कर्णधार लॉरा वोल्वार्ड २७ चेंडूत पाच चौकारांच्या मदतीने ३३ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतली. येथून संघाने सातत्याने विकेट्स गमावल्या, ज्यामुळे त्यांना दुसऱ्या टी-२० विश्वचषकाच्या फायनलमध्ये पराभव पत्करावा लागला.

### आफ्रिका संघ पुन्हा ठरला 'चोकर्स'


न्यूझीलंडची ही तिसरी विश्वचषक फायनल होती. त्यांनी २४ वर्षांनंतर विश्वचषक जिंकला आहे. याआधी न्यूझीलंड संघाने २००० साली महिला वनडे विश्वचषक जिंकला होता, मात्र महिला टी-२० विश्वचषकावर पहिल्यांदाच नाव कोरले आहे. दुसरीकडे यंदाही दक्षिण आफ्रिका संघ 'चोकर्स'चा शिक्का पुसण्यात अपयशी ठरला, कारण या संघाचा सलग दुसऱ्यांदा टी-२० विश्वचषकाच्या फायनलमध्ये पराभव झाला आहे.

# कागिसो रबाडाचा कसोटीत विश्वविक्रम

## सर्वात कमी चेंडूत गाठला ३०० विकेट्सचा टप्पा

**ढाका : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेचा धडाकेबाज वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाने बांगलादेशचा अनुभवी फलंदाज मुशफिकर रहीमला पहिल्या डावात बाद करीत कसोटी कारकिर्दीतील ३००वी विकेट घेतली. यासह वकार युनूसचा विक्रम मोडीत काढला आहे.



रबाडा हा कसोटी इतिहासातील सर्वात कमी चेंडूत ३०० विकेट्स घेणारा गोलंदाज ठरला. या बाबतीत त्याने पाकिस्तानच्या वकार युनूसचा विक्रम मोडला आहे. वकारने १२,६०२ चेंडूत ३०० कसोटी विकेट्स घेतल्या होत्या. आता रबाडाने त्याचा विक्रम मोडत ११,८८७ चेंडू टाकत ३०० विकेट्स पूर्ण केल्या आहेत. या बाबतीत डेल स्टेन तिसऱ्या स्थानावर (१२६०५ चेंडू) आणि लन डोनाल्ड चौथ्या स्थानावर (१३६७२ चेंडू) आहे.

क्रिकेटच्या सर्वात मोठ्या फॉरमॅटमध्ये ३०० विकेट्स पूर्ण करणारा रबाडा सहावा दक्षिण आफ्रिकेचा गोलंदाज ठरला. त्याने आपल्या ६५व्या कसोटी सामन्यात ही कामगिरी केली.

## दुसऱ्या कसोटीसाठी वॉशिंग्टन सुंदरला संधी

**नवी दिल्ली** : पहिल्या कसोटी सामन्यातील दारुण पराभवानंतर भारतीय संघात नवीन अष्टपैलू खेळाडूचा समावेश करण्यात आला आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा सामना पुण्यात होणार आहे. उर्वरित मालिकेसाठी वॉशिंग्टन सुंदरला टीम इंडियात स्थान मिळाले आहे.

संघ : रोहित शर्मा (कर्णधार), जसप्रीत बुमराह, यशस्वी जैस्वाल, शुबमन गिल, विराट कोहली, लोकेश राहुल, सर्फराज खान, ध्रुव जुरेल, अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, आकाश दीप, वॉशिंग्टन सुंदर.

# आयपीएल मेगा ऑक्शनची बीसीसीआयकडून जोरदार तयारी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगच्या आगामी हंगामासाठी बीसीसीआयने जोरदार तयारी सुरू केली आहे. पुढील महिन्यात आयपीएल २०२५साठी मेगा ऑक्शन आयोजित केला जाणार आहे. लिलावाचे ठिकाण आणि तारीख याबाबत बीसीसीआयने फ्रँचायझींशी सतत चर्चा करत आहे.

बीसीसीआयने मेगा ऑक्शन आयोजित करण्यासाठी सर्व संभाव्य पर्यायांचा शोध घेतला आहे. यामध्ये सौदी अरेबियातील रियाध आणि जेद्दाह या दोन शहरांची निवड करण्यात आली आहेत. त्यामुळे मेगा ऑक्शनच्या जागेबाबत आणि तारीखेबद्दल लवकरच




अंतिम निर्णय घेतला जाईल. यापूर्वी ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्नाव्यतिरिक्त सिंगापूर, लंडन आणि दुबईच्या नावांचा विचार केला जात होता. बीसीसीआयने या शहरांबाबत खूप विचार केला, पण आता सौदी अरेबियाची दोन शहरे सर्वात पुढे आहेत. त्यामुळे आयपीएल २०२५ लिलाव रियाध किंवा जेद्दाह या शहरात आयोजित केला जाऊ शकतो. सध्या रियाध आघाडीवर असून लवकरच अधिकृत घोषणा केली जाईल.

क्रिकबझच्या माहितीनुसार बीसीसीआयने आधीच आपले अधिकारी सौदी अरेबियाला पाठवले आहेत. आणखी एक तुकडी सोमवारी तेथे पोहचू शकते. दोन दिवसांचा लिलाव भारतात व्हावा अशी फ्रेंचायझीची इच्छा होती, परंतु पर्याय उपलब्ध नव्हता. आता ते बीसीसीआयने आयपीएल मेगा लिलावासाठी ठिकाण आणि तारीख निश्चित करण्याची वाट पाहत आहेत, जेणेकरून ते प्रवासाची व्यवस्था करू शकतील.

### पुढील महिन्यात होणार लिलाव प्रक्रिया

आयपीएलचा मेगा ऑक्शन २५-२६ नोव्हेंबर रोजी आयोजित केला जाऊ शकतो. यादरम्यान भारत-ऑस्ट्रेलिया पहिली कसोटी (२२-२६ नोव्हेंबर) खेळली जाणार असल्याने अडथळा निर्माण झाला होता, मात्र मंडळाने यावर तोडगा काढला आहे. आयपीएलचा लिलाव दुपारी होणार आहे. अशा स्थितीत भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्यातील दिवसाचा खेळ सायंकाळपर्यंत संपेल. त्यानंतर आयपीएलचा लिलाव सुरू होईल.

# 'सीकेटी'च्या अनिकेत दुशिंगेची राज्यस्तरीय वुशू स्पर्धेसाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय आणि मुंबई उपनगर यांच्या संयुक्त विद्यमाने बीएमसी स्कूल कांदिवली येथे झालेल्या १७ वर्षांखालील मुंबई विभागीय वुशू स्पर्धेत



नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयातील (सीकेटी) अनिकेत दुशिंगे या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

अनिकेतची नांदेड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय वूशू स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अभिनव ज्ञानमंदिरच्या हर्ष तांबेचे जिल्हास्तरावर यश



**माणगाव : प्रतिनिधी**

तळा तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धेत अभिनव ज्ञानमंदिर उसर खुर्द विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले होते. त्याच यशाची पुनरावृत्ती रसायनी येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेत झाली आहे.

उसर खुर्द विद्यालयाने पावसाळी क्रीडा स्पर्धेत तळा तालुक्याचे नेतृत्व केले. यामध्ये हर्ष बाबुराव तांबे याने ४०० मीटर धावणे स्पर्धेत जिल्हापातळीवर प्रथम क्रमांक मिळवला, तर ६०० मीटरमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. हर्ष हा आता विभाग पातळीवर रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणार आहे.

याशिवाय विद्यार्थ्यांनी चालणे, थाळीफेक, उंच उडी यासारख्या प्रकारात यश संपादन केले आहे. सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा प्रमुख विनोद लाड व गावित यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल शालेय समिती अध्यक्ष किशोर आल्हाट, सदस्य नटे गुरुजी, विजय सावंत, भालेकर तसेच मुख्याध्यापक नागनाथ सुर्वे, संस्थेचे सरचिटणीस निलेश रेवगडे यानी हर्ष तांबे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आणि पुढील विभागीय पातळीवर होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# चेतेश्वर पुजाराने शतक झळकवत ब्रायन लाराला टाकले मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा अनुभवी खेळाडू चेतेश्वर पुजारा सध्या कसोटी संघातून बाहेर आहे. त्याने रणजी ट्रॉफी स्पर्धेत सौराष्ट्र संघाकडून खेळताना छत्तीसगडविरुद्ध शतक झळकावले. यासह त्याने वेस्ट इंडिजचा महान फलंदाज ब्रायन लाराचा विक्रम मोडला.

पुजाराच्या प्रथम श्रेणी कारकिर्दीतील हे ६६वे शतक आहे. लाराने प्रथम श्रेणीत ६५ शतके झळकावलीत. भारतासाठी प्रथम श्रेणीमध्ये सचिन तेंडुलकर आणि सुनील गावसकर यांनी सर्वाधिक प्रत्येकी ८१ शतके झळकावली आहेत.



### २१ हजार धावाही पूर्ण

शतक झळकावल्यानंतर चेतेश्वर पुजाराने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये २१ हजार धावा पूर्ण केल्या आहेत. तो प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा चौथा भारतीय फलंदाज ठरला आहे. सुनील गावसकर, सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड यांनी भारतासाठी प्रथम श्रेणीत त्याच्यापेक्षा जास्त धावा केल्या आहेत. भारतासाठी प्रथम श्रेणीत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम गावसकर यांच्या नावावर आहे. त्यांनी २५,८३४ धावा केल्या आहेत.

# 'विरूष्का' पुन्हा रमले कीर्तनात

## मुंबईतील व्हिडीओ व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

न्यूझीलंडविरुद्धचा पहिला कसोटी सामना संपल्यानंतर विराट आणि त्याची पत्नी अनुष्का शर्मासह मुंबईतील नेस्को येथे कृष्ण दास यांच्या कीर्तनाला उपस्थित होता, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये अनुष्का आणि विराटचा आनंदी दिसत आहेत. अनुष्का विराटसोबत टाळ्या वाजवताना ती कीर्तनात रमल्याचे दिसत आहे. याशिवाय ती कीर्तनाचाही आनंद घेत आहे. या वेळी अनुष्का क्रीम रंगाच्या को-ऑर्डर सेटमध्ये खूप सुंदर दिसत होती, तर विराटने फुल-स्लीव्ह टी-शर्ट, निळ्या डेनिम पँट आणि लाल कॅप परिधान केली होती.



अनुष्का शर्मा आणि विराट कोहली कीर्तनात सहभागी होण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी जुलैमध्ये लंडनमध्ये अशाच एका कार्यक्रमात या कपलने हजेरी लावली होती. जूनमध्ये भारताच्या टी-२० विश्वचषक विजेतेपदानंतर कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून ब्रेक घेतला, तेव्हा पण एक व्हिडीओ व्हायरल झाला होता. अनुष्काने त्या वेळी कीर्तनातील फोटोदेखील शेअर केले होते.

# बाबर आझमने सध्या देशांतर्गत क्रिकेट खेळावे -वीरेंद्र सेहवाग

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा माजी कर्णधार बाबर आझमला खराब फॉर्ममुळे इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या कसोटीतून वगळण्यात आले. त्याच्यासह शाहीन शाह आफ्रिदी आणि नसीम शाह यांना डच्चू मिळाला. संघाबाहेर असलेल्या बाबरला सल्ला देताना भारताचा माजी खेळाडू वीरेंद्र सेहवागने देशांतर्गत क्रिकेटकडे वळण्यास सांगितले आहे.

तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना जिंकून पाहुण्या इंग्लंडने विजयी सलामी दिली. मग दुसऱ्या सामन्यातील विजयासह यजमान पाकिस्तानने १-१ अशी बरोबरी साधली. त्यामुळे मालिकेतील अखेरचा सामना निर्णायक असेल. दुसऱ्या सामन्यात बाबरच्या जागी संधी मिळालेल्या कामरान गुलामने शानदार शतकी खेळी करुन आपल्या संघाच्या विजयात मोठे योगदान दिले.

शोएब अख्तरच्या युट्यूब चॅनलवर बोलताना सेहवागने सांगितले की, बाबर आझमने देशांतर्गत क्रिकेटमध्ये सहभागी व्हायला हवे. तिथे चांगली कामगिरी केल्यास तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये जोरदार पुनरागमन करू शकतो तसेच त्याने फिटनेसवर लक्ष केंद्रित करायला हवे. कुटुंबीयांसोबत वेळ घालवावा. मानसिकदृष्टच्या तंदुरुस्त असलेला खेळाडूच शारीरिकदृष्टच्या तंदुरुस्त असतो हे वेगळे सांगायला नको.

**उपसंपादक पाहिजे**

**दै. रामप्रहरला उपसंपादक या पदासाठी** जागा भरायची आहे. त्याकरिता पत्रकारितेची पदवी, पत्रकारितेतील किमान पाच वर्षांचा अनुभव, बातम्या संकलन करणे व पाने लावण्याचे कसब तसेच मुद्रितशोधनाचे ज्ञान आवश्यक आहे.
इच्छुकांनी आपले अर्ज आणि सी.व्ही. (वैयक्तिक माहिती) ramprahar@gmail.com या ई-मेलवर किंवा ७७३८१०६००९ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावेत.

**पत्ता : दै. रामप्रहर, अस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, शॉप नं. ४, एमटीएनएल रोड, पनवेल, ४१०२०६**

अधिक माहितीसाठी ९७६९६६४४६४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com